
# भारताचे आणखी दोन टँकर्स होर्मुझच्या सामुद्रधुनीतून पार



**तेहरान :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमधील तणाव कायम असताना शनिवारी (दि.२८) भारतासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. इराणने संघर्षाच्या काळात भारत आणि इतर चार 'मित्र राष्ट्रांना' या जलमार्गातून आपली जहाजे नेण्याची परवानगी दिली जाईल, असे सांगितल्यानंतर भारताकडे जाणारे आणखी दोन एलपीजी टँकर्स संवेदनशील होर्मुझच्या सामुद्रधुनीतून गेले. शिपिंग डेटानुसार, बीडब्ल्यू ईएलएम आणि बीडब्ल्यू टीवायआर टँकर्सनी युद्धाच्या सुरुवातीपासून प्रभावीपणे बंद असलेल्या या उच्च-जोखमीच्या कॉरिडॉरमधून प्रवास केला. ओमानच्या आखाताच्या दिशेने जात होते. एक महिन्यापूर्वी युद्ध सुरू झाल्यापासून, जग वसंत, पाइन गॅस, शिवालिक आणि नंदा देवी या किमान चार भारतीय ध्वज असलेल्या जहाजांनी या सामुद्रधुनीतून प्रवास केला आहे. भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांपैकी ९०% आयात करतो.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ ◆ अंक २५०

www.ramprahar.com

◆ रविवार, २९ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


कशेडी घाटात शीतपेयांचा ट्रक कलंडला ; चालक जखमी/२

उरणमध्ये ३ एप्रिलपासून यात्रा आणि पालख्या/६

स्टार खेळाडूच्या एन्ट्रीने मुंबई इंडियन्सची ताकद वाढणार/८


# लॉकडाऊनची अफवा पसरवणाऱ्यावर कठोर कारवाई होणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात लॉकडाऊन अजिबात लागणार नाही. अशी अफवा पसरवणारे देशद्रोह करत आहेत. त्यांच्यावर कडक कारवाई केली जाणार आहे, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशातील सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १५ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत शुक्रवारी बैठक घेतली. या बैठकीदरम्यान नेमकी काय चर्चा झाली याची माहिती शनिवारी (दि.२८)मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

जाणीवपूर्वक देशातील काही लोक संभ्रम पसरवत आहेत. लॉकडाऊन लागेल अशा गोष्टी सांगितल्या जात आहेत.



लॉकडाऊन अजिबात लागणार नाही. असल्या गोष्टी पसरवणारे देशद्रोह करत आहेत. म्हणून असा पद्धतीने खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांवर आम्ही कडक कारवाई करणार आहोत, असा इशारा त्यांनी दिला आहे.

पंतप्रधानांनी भर दिला की, देशात अफवा, संभ्रम पसरवून भीतीची स्थिती निर्माण केली जात आहे. त्यावर राज्यांनी कडक कारवाई केली पाहिजे असे सांगितले आहे. लॉकडाऊन लागणार नसून, अफवा पसरवणे चुकीचे आहे, असे ते म्हणाले आहेत. जागतिक स्तरावर इंधनाचे मोठे संकट उभे ठाकलेले असतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे भारताला त्याची झळ बसलेली नाही. देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी केंद्र सरकारची रणनीती तयार आहे, अशी माहितीही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

आपल्याला पुरवठ्याचा कमीत कमी त्रास झाला आहे. पेट्रोल, डिझेल सातत्याने मिळत आहे. घरगुती गॅस सर्वांना मिळत आहेत. मोदींनी अत्यंत चांगल्या प्रकारे हे संकट हाताळले आहे. पेट्रोल डिझेलच्या पुरवठ्यात कमतरता होऊ दिली नाही. वाढलेल्या किंमतीचा फटका सरकारनेच सहन केला असून ग्राहकांवर टाकलेला नाही. गॅस सिलेंडर एलपीजी लोकांना उपलब्ध करुन दिले आहेत. कमर्शिर सिलेंडरचं प्रमाणही ७० टयांपर्यंत नेण्याच काम केले. यासाठी सर्वांनी त्यांचे कौतुक केले, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. मोदींनी दीर्घकाल धोरण सांगितले असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

पुढे त्यांनी सांगितले की, कालच आपण एक जीआर काढून सगळ्या पालिका, महापालिका क्षेत्रात गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी अटी शिथील केल्या आहेत. पाईपलाईन टाकल्यास पीएनजी उपलब्ध आहे. एलपीजीची आवश्यकता राहणार आहे. शहरांवरील एलपीजीचा भार कमी केला तर भविष्यात अशा स्थितीत अडचण होणार नाही.



# राज्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या पनवेल महापालिकेला प्रशस्तीपत्र प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा प्रशस्तीपत्र प्रदान समारंभ शनिवारी (दि.२८) उत्साहात झाला.

या कार्यक्रमात ई-गव्हर्नन्स सुधारणा तसेच सेवाकर्मी प्लस उपक्रमात पनवेल महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविल्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

राज्यातल्या एकूण २९ महानगरपालिकांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला होता. अनेक मोठ्या व अनुभवी महानगरपालिका स्पर्धेत असताना पनवेल महानगरपालिकेने आपला झेंडा फडकवला असून याबाबत पनवेलचे विशेष कौतुक होत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या नेतृत्वात परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे व संगणक विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या टीमने अथक मेहनत करीत हा बहुमान पटकावला आहे. पनवेल महापालिकेने यापूर्वीही १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमामध्ये चांगली कामगिरी बजावत तिसरा क्रमांक पटकावला होता.

> *पनवेल महानगरपालिकेने मिळवलेले हे यश केवळ क्रमांकापुरते मर्यादित नसून प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुख सेवांचा परिणाम आहे. या यशामागे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समन्वय, परिश्रम आणि बांधिलकी आहे. भविष्यातही याच दिशेने अधिक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून पनवेल महानगरपालिका राज्यात आदर्श ठरेल, असा मला विश्वास आहे.*
>
> **-मंगेश चितळे,** आयुक्त

**ई-गव्हर्नन्स कार्यक्रम**

१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमामधे महानगरपालिकेचे संकेतस्थळ वापरण्यास सुलभ, सुरक्षित, अद्ययावत असणे; महानगरपालिकेचे Dashboard विकसित करणे; आपले सरकार अंतर्गत नागरिकांना विहित वेळेत सुलभतेने सेवा पुरवणे; कार्यालयात e-officeचा प्रभावी वापर करणे; Whatsapp Chatbotचा वापर करणे; AIचा वापर करणे; GISचा वापर करणे अश्या घटकांचा समावेश होता. (पान २ वर..)

# राज्यात १ एप्रिलपासून वीजदरात कपात

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील लाखो वीज ग्राहकांसाठी दिलासादायक बातमी असून, येत्या १ एप्रिलपासून वीजदरात कपात लागू होणार आहे.



१०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांसाठी प्रति युनिट दरात सुमारे एक रुपयाची कपात करण्यात आली असून, आता त्यांना ८.१४ रुपयांऐवजी ७.१० रुपये मोजावे लागणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणच्या पाच वर्षांच्या वीजदर कपात याचिकेला मंजुरी दिल्याने हा मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या वर्षभरापासून ही याचिका न्यायालयीन प्रक्रियेत अडकली होती. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार, तांत्रिक बाबींची पूर्तता करून आयोगाने आता नवा आदेश प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे आगामी पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने वीजदर कमी होणार आहेत.

नवीन दरपत्रकानुसार, घरगुती ग्राहकांसाठी १०० ते ३०० युनिटपर्यंतचा दर १३.२३ रुपयांवरून १२.९४ पैसे इतका कमी झाला आहे. औद्योगिक ग्राहकांसाठीही दिलासा मिळाला असून, त्यांचा दर १०.८८ रुपयांवरून १०.७१ पैसे करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांच्या सवलती महावितरणने कायम ठेवल्या आहेत.

# एसआयआर अभियानाच्या पनवेल विधानसभा प्रमुखपदी परेश ठाकूर

## प्रदेशाध्यक्षांकडून नियुक्ती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सहीच्या अधिकृत पत्राद्वारे महाराष्ट्रात सुरू होणाऱ्या मतदार पुनर्निरीक्षण (SIR) अभियानासाठी भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशतर्फे १८८ - पनवेल विधानसभा क्षेत्राचा BLA-१ (विधानसभा प्रमुख) म्हणून पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद व प्रेरणादायी बाब आहे. त्यांच्या नेतृत्वातून संघटन अधिक बळकट होऊन कार्याला नवी गती मिळेल, असा विश्वास आहे असे म्हणत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरसेवक परेश ठाकूर यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले आहे.

## निवडक

### १ एप्रिलपासून ऑनलाईन पेमेंटचे नियम बदलणार

**नवी दिल्ली :** १ एप्रिलपासून तुमचे डिजिटल व्यवहार करण्याची पद्धत पूर्णपणे बदलणार आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनं फसवणूक रोखण्यासाठी नवीन नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेने आता सर्व डिजिटल व्यवहारांसाठी 'टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन' अनिवार्य केलेय. आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सर्व बँका, कार्ड नेटवर्क आणि फिनटेक कंपन्यांना ग्राहकांना ऑथेंटिकेशनसाठी विविध पर्याय द्यावे लागतील. यापैकी एक पर्याय 'डायनेमिक' असणं गरजेचं आहे.

### नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन

**नवी दिल्ली :** देशाच्या विमान वाहतूक क्षेत्रात मोठी झेप घेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील जेवर येथे नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले. या प्रकल्पामुळे दिल्ली-एनसीआर परिसरातील हवाई कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे.सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) मॉडेलवर सुमारे ११,२०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे.



# जासई येथे शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन

**उरण : रामप्रहर वृत्त**

इमारतीचे काम लवकरात लवकर आणि दर्जेदार होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जासई येथे केले. जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनियर कॉलेजमध्ये सहा खोल्यांच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन शनिवारी (दि.२८) लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

पनवेल आणि उरण तालुक्यातील हे पहिले हायस्कूल असल्याने या संस्थेशी सर्वांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यामुळे या नवीन इमारतीचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी जागृत राहावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी उपस्थित पदाधिकारी आणि ग्रामस्थांना दिला. या कार्यक्रमाला इमारतीच्या कामासाठी सढळ हस्ते देणगी देणाऱ्या मान्यवरांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. (पान २ वर..)

# राज्य कबड्डी स्पर्धेत रायगडच्या संघांनी नाव उज्ज्वल करावे -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिन्नर (नाशिक) येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या पुरुष व महिला संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. रायगडचे दोन्ही संघ तुल्यबळ असून खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे. सर्वांनी एकजुटीने खेळ करत उत्तम यश संपादन करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.



दरम्यान, सराव शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही भेट देऊन खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यांनी सर्व खेळाडूंना शुभाशीर्वाद देत स्पर्धेत यशस्वी होण्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सल्लागारपदी निवड झाल्याबद्दल पुरुष व महिला संघांच्या वतीने त्यांचा क्रीडांगणावर सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तयारीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पुरुष व महिला कबड्डी संघाच्या सराव शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन खेळाडूंना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, संघ व्यवस्थापक प्रमोद म्हात्रे, सुनील पाटील, विनोद नाईक, विश्वनाथ पाटील, संकेत म्हात्रे, मंदार मुंबईकर, विपुल मोकल, पदाधिकारी आणि खेळाडू उपस्थित होते. (पान २ वर..)

# जलपर्णीच्या फुलांनी बहरली भीमा नदी

## दौंड येथे निसर्गरम्य दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी



**पुणे : प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील हातवळण येथील भीमा नदी सध्या जलपर्णीच्या विळख्यात अडकली असली तरी त्या जलपर्णीवर उमललेल्या आकर्षक जांभळट फुलांमुळे परिसरात नयनरम्य दृश्य निर्माण झाले आहे. या मनमोहक दृश्याचा आनंद घेण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांसह बाहेरील पर्यटकही मोठ्या संख्येने येथे भेट देत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

भीमा नदीच्या पाण्यावर दाट प्रमाणात पसरलेल्या जलपर्णीमध्ये उमललेली जांभळट फुले नदीकाठाला वेगळेच सौंदर्य प्रदान करत आहेत. विशेषतः सकाळ आणि सायंकाळच्या वेळेत हे दृश्य अधिक खुलून दिसत असल्याने अनेक जण खास त्या वेळेत येथे येत आहेत. कुटुंबासोबत फिरणे, मित्रमंडळींसोबत वेळ घालवणे तसेच निसर्ग छायाचित्रणासाठी हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

युवक-युवतींमध्ये या ठिकाणाबद्दल विशेष उत्सुकता दिसून येत असून सेल्फी काढणे, रील्स आणि व्हिडिओ तयार करून ते फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप यांसारख्या सोशल मीडियावर शेअर करण्याचा ट्रेंड वाढला आहे. त्यामुळे हातवळण येथील भीमा नदी परिसराची ओळख अधिक व्यापक स्तरावर पोहोचत असल्याचे दिसून येते, मात्र जलपर्णीचे वाढते प्रमाण नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा ठरत असून जलप्रदूषण आणि जैवविविधतेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन मासेमारी व्यवसायावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता परिसरात कोणतीही विशेष सुरक्षा व्यवस्था नसल्याने काही प्रमाणात धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने जलपर्णी हटविण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# मुंबईत उकाडा, तर विदर्भात वादळी पावसाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात हवामानाने अचानक कोंडी केली असून एका बाजूला मुंबईमध्ये उकाड्याने अक्षरशः घामाच्या धारा सुरू आहेत, तर दुसरीकडे विदर्भात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील २४ तासांसाठी सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या दिशेने येणाऱ्या वाऱ्यांमुळे देशातील हवामानात मोठा बदल झाला आहे. तसेच बंगालच्या उपसागराकडूनही हवामान प्रणाली सक्रिय झाली आहे, तर वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे उत्तरेकडून थंड वाऱ्यांचा प्रभाव जाणवत आहे.

२९ मार्च रोजी कोकण वगळता राज्यभर मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ३०,३१ मार्च आणि १ एप्रिलदरम्यान राज्यभर विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता असून IMD ने अलर्ट जारी केला आहे.

# महाराष्ट्रातील पशुपालकांना दिलासा

## ■ सरसकट मदतीची राज्य सरकारची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**



गेल्या वर्षी जून ते सप्टेंबर या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान सोसाव्या लागलेल्या पशुपालकांसाठी राज्य सरकारने मदतीचा नवा आणि सर्वसमावेशक आराखडा जाहीर केला आहे. यापूर्वी मदतीसाठी असलेल्या जाचक अटींमध्ये महत्त्वाचे बदल करून आता 'सरसकट मदत' देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

मृत पावलेल्या जनावरांच्या संख्येवर लावलेली मर्यादेची अट आता शिथिल करण्यात आली असून, नैसर्गिक आपत्तीत दगावलेल्या सर्व जनावरांच्या नुकसानीपोटी सरकारकडून भरपाई दिली जाणार आहे. फडणवीस सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे यापूर्वी मदतीपासून वंचित राहिलेल्या शेकडो पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. केवळ मृत जनावरांसाठीच नव्हे, तर पावसाने कोसळलेल्या किंवा नुकसान झालेल्या गोठ्यांच्या दुरुस्तीसाठीही विशेष मदतीची तरतूद करण्यात आली आहे. नियमातील या ऐतिहासिक बदलामुळे अतिवृष्टीचा फटका बसलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी मिळण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आता केवळ अल्प किंवा अत्यल्प भूधारकच नव्हे, तर सर्व आपद्ग्रस्त पशुपालक आणि भूमिहीन शेतकरीही मदतीसाठी पात्र ठरतील. पूर्वी असलेल्या जनावरांच्या संख्येच्या मर्यादा (उदा. ३ किंवा ६ जनावरे) आता पूर्णपणे हटवण्यात आल्या आहेत. केवळ मृतच नव्हे, तर पुरात वाहून गेलेली किंवा बेपत्ता झालेली सर्व जनावरे आता मदतीसाठी पात्र धरली जातील. पोल्ट्रीसाठी असलेली १० हजार रुपयांची जुनी मर्यादा काढून आता सर्व मृत पक्षांसाठी भरपाई दिली जाईल.

# ‘राज्यात पीएनजी प्रक्रियेला गती, खत उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा सुरु’

## ◆ केंद्राच्या प्रभावी नेतृत्वामुळे संकटातही देश स्थिर; ◆ महाराष्ट्र शासन केंद्राच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करेल

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने संतुलित आणि प्रभावी धोरण राबवले असून, यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची महत्त्वाची भूमिका आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या संकटकाळात महाराष्ट्रात पीएनजी (पाईप्ड पद्धतीने वितरण) वितरणाला गती देण्यात येत असून खतांच्या उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा घेतला जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही सहभागी झाले होते. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या वतीने मुद्दे मांडले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्रिमंडळ सचिव तसेच विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल उपस्थित होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी या बैठकीला उपस्थित होते.

सध्याच्या कठीण काळात पश्चिम आशिया खंडातील युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक संकट काळात देशातील नागरिकांवर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

राज्यात खतांची पुरेशी उपलब्धता असून त्याचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. याचबरोबर काळाबाजार व साठेबाजी रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येत आहे. शेतीशी संबंधित बाबी ‘अॅग्रीस्टॅक’ प्रणालीशी जोडण्याचे काम सुरू असून त्यामुळे गैरप्रकारांना आळा बसणार आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सातत्याने बैठका घेतल्या जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्र सरकारच्या सर्व सूचनांचे राज्य शासन पूर्णपणे पालन करेल, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) वितरणाला गती देण्यात आली असून ‘ईज ऑफ डुइंग बिझनेस’च्या माध्यमातून प्रक्रिया सुलभ केली जात आहे. या संकटाकाळात केंद्र शासनाच्या नेतृत्वाखाली राज्य शासन आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडेल, असा विश्वासही यांनी व्यक्त केला.

इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने उत्पादन शुल्कात (एक्साइज शुल्क) केलेली कपात ही सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा देणारी असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.जगातील अनेक देशांत पेट्रोल–डिझेलचे दर २० ते ३० टयांनी वाढले असताना भारतात त्याचा भार नागरिकांवर पडू दिला नाही. ‘राष्ट्र प्रथम, भारतीय प्रथम’ या तत्त्वानुसार केंद्र सरकारने हा आर्थिक भार स्वतः उचलला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या अकरा वर्षांत ऊर्जा क्षेत्रात करण्यात आलेल्या बदलांचा आज मोठा फायदा होत असल्याचेही सांगून पूर्वी २७ देशांकडून इंधन आयात केले जात होती, ती आता ४१ देशांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे पुरवठा खंडित होण्याचा धोका कमी झाला आहे. ई–बस आणि सौरऊर्जेसारख्या पर्यायी स्रोतांवर दिलेला भरही या परिस्थितीत उपयुक्त ठरत आहे. एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू असून आत्मनिर्भर भारत अभियानाचे सकारात्मक परिणाम दिसून येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

## कशेडी घाटरस्त्यावर शीतपेयांचा ट्रक कलंडला; चालक जखमी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील चोळईतील तीव्र वळणाचा उतार गेल्या अनेक वर्षांपासून महामार्ग रूंदीकरणापूर्वीही धोकादायक ठरलेला असून शनिवारी दुपारी याच वळणावर शीतपेयांचा ट्रक कलंडल्याने चालक जखमी झाला आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरणावेळी धोकादायक वळणे तसेच तीव्र वळणाचा उतार कमी करून चौपदरीकरण न झाल्याने चोळईतील तीव्र वळणाचा उतार रूंदीकरणापूर्वीपासून गेली अनेक वर्षे धोकादायक ठरत आहे. चोळईतील तीव्र उतारावर रिक्षेतील विद्यार्थिनींचा अपघात, आ.योगेश कदम यांचा अपघात तसेच अनेक अपघात सातत्याने होत आहेत.

शनिवारी, दुपारी रत्नागिरी येथून मुंबईच्या दिशेने शीतपेयांच्या बाटल्यांचे पॅकिंग घेऊन निघालेल्या ट्रक (क्रमांक एमएच ४६ सीक्यू ५१८६)कशेडी घाटरस्त्यावरील चोळईतील तीव्र वळणाचा उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने कलंडला. यामुळे झालेल्या अपघातामध्ये ट्रकचालक जखमी झाला. चालकाला तातडीने पोलादपूर ग्रामीण रूग्णलयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. या अपघातप्रकरणी पोलादपूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मुरूड येथे आज रक्तदान शिबिर

**मुरूड :** अलिबाग–मुरुड मेडिकल असोसिएशन, जंजिरा मेडिकल असोसिएशन व जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने ब्लड बँक, सिव्हिल हॉस्पिटल अलिबाग यांच्या सौजन्याने रविवार, २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळात रक्तदान शिबिराचे आयोजन कल्याणी हॉस्पिटल मुरुड–जंजिरा येथे करण्यात आले आहे. या राष्ट्रीय कार्यक्रमास रक्तदात्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन जंजिरा मेडिकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील व डॉ. मयुर कल्याणी यांनी केले आहे.

## अशोक ल.लोखंडे विद्यालयाचे चेअरमनपदी गणपत जगताप

**मुरूड :** पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाची सन २०२६ ते २०२९ या कार्यकालासाठी कार्यकारिणी निवडीची सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. त्या सभेमध्ये नवनिर्वाचित सदस्यांची निवड करण्यात आली. संस्थेचे चेअरमन म्हणून गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड व लक्ष्मण मनवल गुरुजी, सचिव गोविंद ठाकर गुरुजी तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून कृष्णा पंदेरे गुरुजी, खेळू वाजे, संजय रेडीज, कृष्णकांत पवार, रामचंद्र अडखळे, दीपक शिगवण व नारायण गायकवाड यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

ह्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे अभिनंदन संस्थेचे विश्वस्त वसंत शेठ लोखंडे, महादेव गोळे यांनी केले व पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या .

## विद्यासेवक पतपेढी हे एक मोठे कुटुंब –आमदार डावखरे

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे पालघर जिल्ह्यातील सुमारे ७ हजार शिक्षक शिक्षकेतर सदस्य संख्या असलेली ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतसंस्था ही एक मोठे कुटुंब असून या कुटुंबात प्रत्येक सदस्याचा सन्मान राखला जातो, या पतसंस्थेने माझ्या सारख्या कार्यकर्त्याला देखील सामावून घेतले आहे त्याबद्दल मी विद्यासेवकचा ऋणी आहे, असे उद्गार कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी काढले. माजी आमदार रामनाथ मोते यांच्या ७४ व्या जयंतीनिमित्त अंबरनाथ येथील धर्मवीर आनंद दिघे नाट्यमंदिरात विद्यासेवक पतसंस्थेने आयोजित ‘गीतरामायण कार्यक्रम व सभासद सहकार प्रशिक्षण’ कार्यक्रमात ते बोलत होते.

कोकण विभागाचे माजी आमदार रामनाथ मोते यांची जयंती विद्यासेवक पतसंस्था व शिक्षक शिक्षकेतर कार्यकर्त्यांद्वारे विविध उपक्रमाचे आयोजन करून दरवर्षी साजरी केली जाते. यावर्षी पतसंस्थेच्या माध्यमातून पतसंस्थेच्या सभासदांकरिता सुश्राव्य गीतरामायण कार्यक्रमाचे व सभासद सहकार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध निवेदक व कवी हेमंत बर्वे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह संगीतमय गीतरामायण सादर केला. त्याचबरोबर उत्तरार्धात महाराष्ट्र सहकारी संघ मर्यादित, पुणे येथील प्रशासन व आस्थापना विभागाचे उपमुख्याधिकारी संजय आगरकर यांनी सभासद सहकार प्रशिक्षणात सहकार क्षेत्रात वेळोवेळी झालेले बदल तसेच सभासदांचे हक्क व कर्तव्ये याबाबत सभासदांना माहिती दिली.

कार्यक्रमात कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व अंबरनाथ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तेजस्वी करंजुले पाटील यांनी उपस्थितांना श्रीरामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना विद्यासेवक पतसंस्थेचे अध्यक्ष सुधीर घागस यांनी माजी शिक्षक आमदार रामनाथ मोते सरांनी केलेल्या शैक्षणिक कार्यास व शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानास उजाळा दिला. त्याचबरोबर विद्यासेवक पतसंस्था राबवत असलेल्या सभासद हिताच्या अनेक योजनांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. याप्रसंगी माजी आमदार रामनाथ मोते यांच्या जीवनावर व शैक्षणिक कार्यावर आधारित सुधीर घागस यांच्या संकल्पनेतून तयार केलेली हृदयस्पर्शी चित्रफित दाखविण्यात आली. याच कार्यक्रमात ठाणे जिल्हा विद्यासेवक पतपेढी लिमिटेड मोबाईल ॲपचे लोकार्पण आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधना जोशी यांनी तर आभार प्रदर्शन संचालक धनाजी दळवी यांनी केले. कार्यक्रमास पतसंस्थेचे आजी – माजी पदाधिकारी, संचालक, संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक शिक्षकेतर उपस्थित होते.

पान १ वरुन

## राज्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या पनवेल महापालिकेला प्रशस्तीपत्र प्रदान

आयुक्त मंगेश चितळे यांनी आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यावर लगेचच कार्यालयात e–office सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे आयुक्तांच्या संकल्पनेतून विकसित करण्यात आलेल्या Panvel Connect App द्वारे नागरिकांना सुलभ सेवा प्रदान करता आल्या. याचा मोठ्या प्रमाणात फायदा या स्पर्धेसाठी झाला.

सेवाकर्मी प्लस कार्यक्रम : कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये संपूर्ण राज्यातून २९ महानगरपालिकांचा सहभाग होता. या सर्व महानगरपालिकांमधून एकच क्रमांक काढण्यात आला असून तो पनवेल महानगरपालिकेने पटकाविला.

सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्याकरीता 'सेवाविषयक बाबींच्या गुणांकनाचा सेवाकर्मी कार्यक्रमा'मध्ये आकृतिबंध मंजूर असणे, सेवाप्रवेश नियम मंजूर असणे, सेवाज्येष्ठता अद्ययावत करून प्रसिद्ध करणे, पदोन्नती पदांची स्थिती, सरळसेवा पदांची स्थिती, बिंदुनामवाली प्रमाणित असणे, अनुकंपा नियुया, iGOT रजिस्ट्रेशन व प्रशिक्षण, सेवापुस्तक अद्ययावत करणे अश्या नऊ मुद्द्यांवर आधारित मूल्यांकन झाले होते. यामध्ये १०० पैकी ९६ गुण घेऊन पनवेल महानगरपालिकेने बाजी मारली आहे.

तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या दूरदृष्टीने त्यावेळी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. त्याचा विशेष फायदा या स्पर्धेसाठी झाला. आयुक्त मंगेश चितळे यांनी आयुक्तपदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी जसे की सेवाजेष्ठता यादी, आश्वासित प्रगती योजना राबविणे, पदोन्नती देणे व भरती प्रक्रिया पार पाडणे यास प्राधान्य दिले. अशा बाबींमुळे सेवाकर्मी स्पर्धेत फायदा झाला.

या घटकांचे सादरीकरण दिनांक १० जानेवारी रोजी महानगरपालिकेने सादर केले होते. या स्पर्धेचे मूल्यांकन Quality Council Of India (QCI) या राष्ट्रीय संस्थेने पारदर्शक पणे केले होते. आज पुरस्कार प्रशस्तीपत्र वितरण समारंभावेळी प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या कार्यालय प्रमुखांना कार्याचे सादरीकरण करण्याची संधी देण्यात आली होती. यावेळी पनवेल महानगरपालिकेने केलेल्या सादरीकरणाची उपस्थितांनी प्रशंसा केली.

तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांची प्रेरणा व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नेतृत्वाखाली संगणक विभागप्रमुख वर्षा पालवे, दिशा टाक व कर्मचारी यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली.

## जासई येथे शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन

या भूमिपूजन सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, रवीशेठ पाटील, सुधीर घरत सल्लागार कमिटीचे चेअरमन अरुणशेठ जागे, व्हाईस चेअरमन दशरथ ठाकूर, सुरेश पाटील, नरेश घरत, विभागीय अधिकारी मोहन कोंगरे, बाळासाहे कारंडे, सह विभागीय अधिकारी विलास जगताप, प्राचार्य कांता म्हात्रे, उपप्राचार्य व्ही. के. कुटे, पर्यवेक्षिका के.एस. मुकादम यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्य कबड्डी स्पर्धेत रायगडच्या संघांनी नाव उज्वल करावे –आमदार प्रशांत ठाकूर

सिन्नर (जि. नाशिक) येथे २ ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघाची सक्षम तयारी व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सराव शिबिर दररोज सकाळी ६ ते सकाळी ९ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत क्रीडांगणावर होत असून दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी पुरुष व महिला कबड्डी संघ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड स्पर्धेसाठी सिन्नर, नाशिक येथे रवाना होणार आहेत.



## कर्जत तालुका ठेकेदार संघटनेतर्फे बेमुदत उपोषण स्थगित

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका ठेकेदार संघटना यांच्या वतीने ठेकेदारांनी कर्जत तालुक्यात सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या मार्फत जी काम केली आहेत. त्यांची बिले दोन ते तीन वर्षापासून प्रलंबित आहेत. त्यामुळे ठेकेदार अर्थिक संकटात सापडले असून त्यांना यातून बाहेर काढण्यासाठी सर्व बिले तातडीने मिळावीत, या मागणीसाठी संघटनेच्या वतीने राहुल डाळिंबकर यांनी बुधवार पासून सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या आवारात बेमुदत उपोषण सुरू केले होते. आमदार महेंद्र थोरवे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन एप्रिल महिन्यात जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यात येईल. असे आश्वासन दिल्याने उपोषण स्थगित करण्यात आले.



आंदोलनाला संघटनेच्या ३५ ठेकेदारांनी साखळी पद्धतीने पाठिंबा दिला आहे. कर्जत तालुक्यातील ठेकेदारांनी विकासकामांची केलेल्या शेकडो कोटींची बिले तीन वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे ते संकटात आहेत. कर्जावरील व्याज वाढले, सप्लायर्सचा उधारीसाठी तगादा. आदिवासी उपयोजनांतर्गत साधारणतः १२५ कोटी, आदिवासी भागातील कामांची १९० कोटी, तसेच विविध हेडखाली साधारणतः ५० कोटी इतक्या रकमेची बिले प्रलंबित असून दीड वर्षात ठेकेदारांना एकही रुपयाचे बिल मिळाले नाही.

त्यामुळे ठेकेदारांची आर्थिक स्थिती खालावली आहे. बँकांमधून घेतलेल्या कर्जाचे व्याज वाढत आहे. मटेरियल सप्लायर्स यांनी उधारीसाठी तगादा लावला आहे. त्यामुळे मार्चमध्ये केलेल्या कामाची बिले मिळाली नाहीत, तर ठेकेदारांना आत्महत्ये शिवाय पर्याय नाही. याकडे आंदोलनाद्वारे लक्ष वेधण्यात आले होते.

आमदार महेंद्र थोरवे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता पनवेल संदीप चव्हाण आणि सार्वजनिक बांधकाम विभाग कर्जत उपाभियंता राहुल देवांग यांनी उपोषणाच्या ठिकाणी सायंकाळी भेट दिली. आमदार महेंद्र थोरवे यांनी ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर व ठेकेदारांची चर्चा करून मी बाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे तसेच एप्रिलमध्ये आदिवासी मंत्री यांनी जास्तीत जास्त निधी देण्याचे कबूल केले आहे त्यामुळे आपण हे उपोषण सोडावे अशी विनंती केली.

## आरसीएफच्या सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ ) तर्फे निगमित सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत थळ युनिट परिसरातील जवळच्या गावांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गरजू व वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.




आरसीएफ वसाहत येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आलेल्या समारंभात गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.कार्यक्रमास आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, वरिष्ठ अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, तसेच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमाचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे.

यावेळी आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे म्हणाले, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. आरसीएफ आपल्या सीएसआर उपक्रमांद्वारे समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी नवी दिशा मिळाली


## दुखवटा

### अनंत पोवार



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे रहिवाशी कै.अनंत भागोजी पोवार यांचे शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११. वा. त्यांच्या राहते घरी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय – ७५ वर्ष त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली,एक मुलगा,जावई,सून,नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.५ एप्रिल रोजी तर उत्तरकार्य विधी मंगळवार दि.७ एप्रिल २०२६ रोजी राहते घरी खांदाड,माणगाव येथे होणार आहेत.

### गौऱ्या पावशे



**अलिबाग :** अलिबागमधील पत्रकार सचिन पावशे यांचे वडील गौऱ्या विठ्ठल पावशे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. निधनासमयी ते ८७ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. उत्तरकार्य मंगळवारी (दि.७) एप्रिल रोजी त्यांच्या राहत्या घरी सकाळी नऊ वाजता होणार असल्याची माहिती पावशे कुटूंबियांकडून देण्यात आली.

# मालमत्ता कर थकबाकीदारांविरोधात जप्ती मोहीम

## पनवेल महापालिकेकडून कंपनी व धारकांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरोधात अटकावणी व जप्ती मोहीम तीव्र करण्यात आली असून नोटीस देऊनही मालमत्ता कर न भरणाऱ्या औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांवर व मालमत्ता धारकांवर अटकवणीची कठोर कारवाई पालिकेकडून करण्यात येत आहे.



आतापर्यंत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे १६७३ नोटीसांचे वाटप केले असून एकूण १३८ मालमत्ता थकबाकीदार मालमत्ता धारकांवर अटकवणीची कठोर कारवाई केल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.

महापालिका प्रशासन थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलत आहे. उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वात जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात आले असून कारवाईला गती देण्यासाठी वसुली टिममध्ये वाढ करण्यात आली आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात तीन लाख ६९ हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन (नोड) तयार केले आहेत. महानगरपालिकेच्या एकूण ९ नोड मध्ये मालमत्ता कराची मागणी एकूण २२८८.८६ कोटी इतकी असून त्यापैकी ६८१.०९ कोटी वसुली करण्यात आली आहे. उर्वरित १६०७.७७ कोटी रुपये मालमत्ता कर वसूल करण्यासाठी मालमत्ता कर विभागाकडून धडक कारवाई सुरू आहे.

### तंत्रज्ञानाद्वारे घरबसल्या टॅक्स भरणे सुलभ

नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'PMC कर मित्र' ॲप सुरू केले आहे.तसेच panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. 'पनवेल कनेक्ट ॲप' च्या माध्यमातूनही करविषयक तक्रार निवारणाची सोय उपलब्ध आहे.

### मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक आणि चॅटबॉट सुविधा उपलब्ध

पनवेल महानगरपालिकेकडून टॅक्स साठी हेल्पलाईन क्रमांक १८०० २६८ ९९६९ सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांच्या मदतीसाठी उपलब्ध आहे. तसेच support@panvelmc.org हा व्हाट्सअप्प चॅटबॉट देखील नागरिकांना मदतीसाठी उपलब्ध आहे.

### सुट्टीच्या दिवशीही कार्यालये राहणार चालू

दिनांक ३१ मार्च ही मालमत्ता कर भरण्याची शेवटची तारीख असून नागरिकांना मालमत्ता करभरणे सोयीचे व्हावे यासाठी मार्च महिन्यातील सर्व शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर वसुली विभाग, लेखा विभाग, नागरी सुविधा केंद्र, पाणी कर संकलन विभाग, प्रभाग समिती अ,ब, क,ड व नावडे उपविभाग सुरू राहणार आहे.

*मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाच स्त्रोत आहे. महापालिकेची विविध विकास कामे सध्या सुरु असून महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर भरून महापालिकेस सहाकार्य करावे.*

***-उपायुक्त स्वरूप खारगे, पनवेल महानगरपालिका***

# गोमांस तस्करीप्रकरणी कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

गोवंश जातीचे मांस मुंबई येथे विक्रीकरीता घेवुन जात असल्याची माहिती मिळाल्याने यातील अटक दोन आरोपीना गोमांस असलेल्या झायलो कार (एमएच ०४ डीवाय २४२१) सह ताब्यात घेवुन पोलीस ठाण्यात आणले. सदर घटनेबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आसू त्यांच्यावर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.




नमुद गुन्हयाचे तपासात यातील अटक आरोपी यासीन मोईनुद्दीन शेख (वय ३७ वर्ष), पासु उस्मान कुरेशी (वय ४५ वर्ष), मोहंमद अली अकबर अली शाह (वय ३० वर्ष) यांचेकडे केलेल्या तपासात सदर गोवंश जातीच्या चार बैलांची कत्तल करून आणलेले मांस हे म्हाप्रळ, येथुन आरोपी गुलामगौस नसरूद्दीन मुकादम, (वय ३७ वर्ष) याचेकडुन आणले असल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हयाचा सखोल तपास केला असता टोळीप्रमुख अटक आरोपी यासीन मोईनुद्दीन शेख याने इतर साथीदारांसह एकत्रितरित्या व संघटीतपणे दहशत दाखवुन हिंसेचा व इतर बेकायदेशीर कृत्यांचा वापर करून सदर बेकायदेशीर कृत्य सतत चालु ठेवलेबाबत त्यांचेवर इतर पोलीस ठाणे येथे देखील गुन्हे दाखल असल्याबाबत उघडकीस आले.

नमुद गुन्हयातील अटक आरोपींनी हिंसाचाराचा वापर करून, धाकदपटशा करून व संघटीतपणे जबरदस्ती करून अवैध मार्गाने परिसरात दहशत माजवुन वर्चस्व निर्माण करण्याकरीता कृत्य केल्याचे दिसुन आल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), ३(४) अन्वये कलमांचा सह पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या परवानगीने व मान्यतेने अंर्तभाव करण्यात आला.

गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाउसाहेब ढोले हे करीत आहेत.

# कळंबोलीत अमली पदार्थांचे सेवन, विक्री करण्यांवर कारवाई करण्याची मागणी

## नगरसेविका बायजा बारगजे यांचे पोलिसांना निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली मध्ये अमली पदार्थाचे सेवन व विक्री होत असल्याबद्दल प्रभाग ८च्या नगरसेविका बायजा बबन बारगजे यांच्या वतीने कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी बबन बारगजे, माणिकराव पवार, बाळासाहेब जगताप, महेंद्र खबाले, वैभव फाळके, कृष्णा गर्जे, दिलीप गर्जे, सचिन मुळीक उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळात भेट दिल्यानंतर राजेंद्र कोते यांनी सांगितले की, आमची ही कारवाई चालूच आहे व नागरिकांनी सुद्धा यामध्ये संशयित व्यक्तींची नावे व ठिकाण आमच्या पोलीस प्रशासनास कळवावेत आम्ही योग्य ती कारवाई करू, असे आश्वासन दिले.

# झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला इसम

**पनवेल : रामप्रहर वृत्तत**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वावंजे गावात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आला आहे.

या अनोळखी मयत पुरुषाचे वय ४५ ते ५० वर्ष असून याने १० ते १५ दिवसापूर्वी पंचाच्या साह्याने अशीच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली होती. बुधाजी नारायण माळी याची सर्व नो ११६/अ, नाझ इंडस्ड्रीजच्या जवळ वावंजे तालुका पनवेल जिल्हा रायगड या ठिकाणी हा मृतदेह आढळून आला.

मयत व्यक्तीने अंगात नाइकचा काळा हाफ बाहांचा टी शर्ट, निळा बर्मुडा, काळ्या रंगाची कॅप, पायात तपकिरी व काळे पट्टे असलेली चप्पल घातलेली आहे. अनोळखी मयत पुरुष वय ४५ ते ५० वर्ष याने १० ते १५ दिवसापूर्वी पंचाच्या साह्याने अशीच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली आहे.

या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत असून याबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी पोलीस ठाणे किंवा सहा पोलीस निरीक्षक अर्चना कुदळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चार लाख ६२ हजार रुपयांच्या लोखंडी सळ्यांचा केला अपहार

**पनवेल : वार्ताहर**

चार लाख ६२ हजार रुपये किमतीच्या सात हजार किलो वजनाच्या लोखंडी सळ्यांचा अपहार केल्याप्रकरणी चालक प्रवीण कुमार याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण ढवळे हे ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून नोकरी करतात. ८ ते ९ मार्चदरम्यान ट्रक ट्रेलरमध्ये ३१ लाख चार हजार रुपये किमतीच्या लोखंडी सळ्या भरून चालक प्रवीण कुमार हा गोदरेज हिल, कल्याण येथे खाली करण्यासाठी निघाला. हा ट्रक ट्रेलर हा प्रवीण कुमार याने पनवेल येथील गॅरेज शिरढोण येथील कंपाऊंडमध्ये उभा केला आणि दोन ते तीन दिवस येणार नाही असे सांगितले. त्यानंतर चालकाला फोन केला असता प्रत्येक वेळी त्याने खोटे कारण सांगितले आणि फोन स्विच ऑफ येऊ लागला. त्यानंतर कल्याण येथील ज्या ठिकाणी माल द्यायचा होता त्या ठिकाणच्या मालकाने फोन करून माल पाठवा असे सांगितले.

हा ट्रक मालासह दुसऱ्या चालकाने त्या ठिकाणी जाऊन वजन केले असता वजन सात हजार किलो कमी असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# कारचालकाने पोलीस चौकीचे केले नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

पोलिसांना धक्काबुक्की करून चौकीच्या आवारातील कुंड्या, प्लास्टिकच्या खुर्चा तसेच चौकीचा काचेचा दरवाजा तोडून नुकसान केल्याप्रकरणी कारचालक शेरबहादूर याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय जाधव हे पनवेल वाहतूक शाखेत पोलीस हवालदार असून, ते गस्त करत असताना एका कारला त्यांनी हात दाखवून थांबण्याचा इशारा केला, मात्र चालकाने कार जाधव यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी त्याला कोनगाव येथील चौकीच्या आवारात आणले असता त्याने चौकीसमोरील झाडांच्या कुंड्या, प्लास्टिकच्या खुर्च्या तसेच चौकीचा काचेचा दरवाजा तोडून नुकसान केले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कळंबोलीत आधुनिक शैक्षणिक संकुल उभारा

## नगरसेवक रामदास शेवाळे यांची महापौरांकडे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर-२०, भूखंड क्र. १८ येथील राखीव जागेवर अत्याधुनिक शैक्षणिक संकुल उभारण्याबाबत कळंबोलीचे नगरसेवक रामदास शेवाळे यांनी पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्यादके मागणीचे निवेदन सादर केले.




या निवेदनामध्ये शेवाळे यांनी या परिसरातील वाढती लोकसंख्या आणि अपुऱ्या शैक्षणिक सुविधांमुळे विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला आहे. त्यामुळे येथील राखीव भूखंडाचा योग्य वापर करून आधुनिक सुविधा असलेले शैक्षणिक संकुल उभारणे गरजेचे असल्याचे शेवाळे यांनी या निवेदनात नमूद केले आहे. या संकुलामध्ये डिजिटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, क्रीडा सुविधा तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे सभापती बबन मुकादम, सहकारी महेश गोडसे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# आवरे येथील मर्दनगडावर एकविरा देवी सोहळ्यात महिलांना पालखीचा मान

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील आवरे येथील ऐतिहासिक मर्दनगडावर श्री एकवीरा माता पालखी सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. २४ व २५ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या या यात्रा सोहळ्यात हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



या यात्रेची सुरुवात २४ मार्च रोजी रात्री 'आईच्या गोंधळाने करण्यात आली. आईच्या गोंधळाचा मान हर्षला दिलेश ठाकूर यांना देण्यात आला, २५ मार्च रोजी सकाळी गडावर विधिवत अभिषेक, गडपूजन आणि होमहवन करण्यात आले. यावेळी अभिषेकाचा मान संजीवनी किरण ठाकूर यांना देण्यात आला. दुपारी भोलानाथ मंदिर ते मर्दनगड दरम्यान भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावर्षी पालखी सोहळ्याचा मान महिलांना देण्यात आला होता. महिला पालखी खांद्यावर घेऊन गडाची वाट चढल्या. पालखी मिरवणूकीत एकविरा मातेचा जयघोष होत होता.

मिरवणुकीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी निरुबाई पाटील, दुर्ग अभ्यासक दुर्गसेवक कैलासराजे घरत, महेश गावंड, सुरेश गावंड, संतोष पाटील, संजय गावंड, मयुर गावंड, सुनिल ठाकूर, अरुण गावंड, प्रशांत भोईर, जे.डी.भोईर, चेतन पाटील, के.टी,बाळू म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, विद्याधर गावंड, गणेश ठाकूर यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेकांनी उपस्थित राहून यात्रा सोहळ्याचा आनंद घेतला. एकविरा देवीची यात्रा यशस्वी करण्यासाठी कौशिक ठाकूर, दिलेश ठाकूर, दिपेश ठाकूर, तुषार म्हात्रे, विनोद ठाकूर, शानेश गावंड, शंकर पाटील, प्रमोद ठाकूर, धिरज ठाकूर, राजेश ठाकूर, हितेंद्र म्हात्रे, ओम ठाकूर, प्रशांत ठाकूर या सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

# आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या नवीन शाखेचे उद्घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यवत संघ, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक एवं राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश दादा पाटील यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

यावेळी राजेन टेकडीकर यांना आंतरराष्ट्रीय बजरंग दल जिल्हा संघटन मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले, तर मच्छिंद्र मगर शाखा अध्यक्ष, तेजस गायकर उपाध्यक्ष, सचिन केणे सचिव, निलेश केणे सल्लागार, विशाल केणे उपाध्यक्ष, पंकज गायकर सचिव, मनिष गायकर उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले.

या अवसरावर पाटील यांनी लव जिहाद आणि हिंदू धर्म रक्षक यावर स्पष्ट विचार मांडले. त्यांनी लव जिहाद ची शिकार झालेल्या मुलीना हिंदू धर्म व संस्कृती विषय माहिती दिली, छत्रपती शिवाजी महाराज व महाराणा प्रताप यांचे गर्वशाली विचार मांडले तसेच हिंदू सणावर व मिरणुक वर होणाऱ्या हल्याचे निषेध केले.



# तक्का येथे डायग्नोस्टिक्स सेंटरचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगल्या उपचारांची सुविधा ऑलिव्ह डायग्नोस्टिक्स केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना मिळेल आणि त्याद्वारे लोकांची उत्तम सेवा होईल, असा विश्वास यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. पनवेल शहरातील तक्का येथे ऑलिव्ह डायग्नोस्टिक्स सेंटरचा भव्य उद्घाटन सोहळा शनिवार, २८ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या ऑलिव्ह डायग्नोस्टिक्स सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. या सेंटरच्या माध्यमातून पनवेल आणि परिसरातील नागरिकांना सोनोग्राफी, डिजिटल एक्स-रे, पॅथॉलॉजी आणि ईसीजी यांसारख्या महत्त्वाच्या आरोग्य सुविधा आता एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. रेडिओलॉजिस्ट डॉक्टर विशाल प्रकाश पाटील आणि डॉक्टर रेहान पाटील यांनी हे सेंटर सुरू केले आहे. पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील नॅशनल पॅराडाईज येथे कार्यान्वित झालेल्या या केंद्रामुळे पनवेलच्या आरोग्य सुविधांमध्ये मोलाची भर पडली आहे.

या उद्घाटनावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भाजप नेते एकनाथ देशेकर, माजी नगरसेवक अनिल भगत, पनवेल पंचायत समितीचे सदस्य राजेंद्र पाटील, नगरसेवक अजय बहिरा, गजानन पाटील यांच्यासह पदाधीकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# पनवेलमध्ये मलाबार ज्वेलरीतर्फे फॅशन शो

**पनवेल : वार्ताहर**

मलाबार ज्वेलरी आयोजित फॅशन शो २०२६ पनवेलमध्ये नुकताच मोठ्या दिमाखात झाला.




या शो मध्ये जवळ जवळ ४० हुन अधिक स्पर्धकांनी भाग घेतला होता या शो मध्ये मिस मध्ये विजेती ठरली अलका तापरानिया तर प्रथम क्रमांक सुश्मिता द्वितीय क्रमांक मेहेक खान ह्यांना मिळाला ह्या तिघींना सेश ट्रॉफी आणि क्राऊन देऊन सन्मानित करण्यात आले तर मिसेस मध्ये विजेती ठरली मेघा घोडके तर प्रथम क्रमांक अपूर्वा वंदिलें द्वितीय क्रमांक श्वेता अहिरे ह्यांना मिळाला ह्या तिघींना सेश ट्रॉफी आणि क्राऊन देऊन सन्मानित करण्यात आले याचसोबत या शो मध्ये संपूर्ण मेकअप अक्षता लांगोटे आणि चारू सप्रे यांनी केला तर पायल गावंड यांनी सुंदर असे वेस्टर्न आऊटफिट दिले. संपूर्ण शो ची कोरिओग्राफी शुभांगी खैरे, फोटोग्राफी महेश बेलापूरकर, विडिओग्राफी युग, तर सूत्रसंचालनाची जवाबदारी सानिका राजगुडे यांनी पार पाडली.

या शो मध्ये परीक्षक म्हणून स्वाती सोनावणे आणि अंकिता सक्सेना यांनी काम पहिले या संपूर्ण शो मध्ये विशेष अतिथी म्हणून प्रणया साळवी, पूनम सावंत, काजल चिकाने, पल्लवी दिवेकर हे उपस्थित होते. हे सर्व जण इंस्टाग्राम वर कन्टेन्ट क्रिएटर म्हणून सुद्धा काम करतात याचसोबत विशेष अतिथी म्हणून सौरभ भोईर सुद्धा उपस्थित होते याचसोबत ह्या शो मध्ये सहभाग घेतलेल्याना सुद्धा ट्रॉफी आणि क्राऊन देऊन सन्मानित करण्यात आले.

ह्या संपूर्ण शो चे व्यवस्थापन मंदार काणे एंटरटेनमेंटचे सर्वे सर्वा मंदार काणे यांनी केले तर हा शो करायला आम्हाला संधी दिल्याबद्दल मंदार काणे यांनी मलाबार ज्वेलरीच्या संपूर्ण टीम चे आभार मानले.

# विवाहितेचा छळ; सासरच्या मंडळींवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

शारीरिक, मानसिक आणि आर्थिक छळ करून क्रूर वागणूक दिल्याप्रकरणी विवाहितेने तिचा पती, सासू-सासरे आणि पतीची मैत्रीण यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी या चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

४१ वर्षीय पीडित महिला तळोजा येथे राहत असून, त्यांना दोन मुले आहेत. २००९ मध्ये त्यांचे लग्न उत्तर प्रदेश येथे झाले. त्यानंतर माहेरहून काही हुंडा आणला नाही, असे बोलून तुझ्या आई-वडिलांकडून पैसे घेऊन ये अन्यथा तुमचा घटस्फोट करेन, अशी धमकी दिली, मात्र पीडितेने माहेरून काही आणले नाही म्हणून सासू-सासरे तिला शिवीगाळ आणि मारहाण करून छळ करू लागले. तर तिच्या पतीच्या मैत्रिणीने त्याला भडकवून पीडितेला मारहाण करायला लावायची. त्याच्या या जाचाला कंटाळून या विवाहितेने या प्रकरणी तळोजा पोलिसांत तक्रार दिली आहे.

# पनवेलमध्ये हनुमान जयंतीनिमित्त सुश्राव्य भजन संध्या; भक्तिमय वातावरणाची रंगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामदास (मारुती) मंदिर, पनवेल यांच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सवाच्या पावन निमित्ताने गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत सुश्राव्य भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भक्तांना आध्यात्मिक समाधान व सुरेल भक्तिगीतांचा आनंद अनुभवण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या विशेष भजन संध्येमध्ये प्रख्यात गायक पं. उमेश चौधरी यांची 'स्वर मैफल' रंगणार असून, त्यांच्या सुमधुर आवाजात सादर होणारी भक्तिगीते भाविकांना मंत्रमुग्ध करतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रमात त्यांना मंगेश चौधरी व अक्षय चौधरी यांची साथ लाभणार आहे. तसेच संवादिनीवर मंदार दीक्षित, तबल्यावर विनायक नाईक, पखवाजवर सूरज गोंधळी तर टाळ वादनासाठी गुरुदास कदम हे कलाकार सहभागी होणार असून, त्यांच्या सुसंवादित वादनामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढणार आहे.

श्री हनुमान जन्मोत्सव हा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा प्रतीक मानला जातो. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या भजन संध्येमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, नागरिकांना एकत्र येऊन अध्यात्मिक अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमास पनवेल व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री रामदास (मारुती) मंदिर विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भारतमाता चित्रपटगृहाशी माझं नातं अगदी वेगळं...

भारतमाता चित्रपटगृहाने छान कात टाकली. ते आजचं झाले.बदल हा होतच असतो, तो व्हायलाही हवा. काही बदल हे परंपरा आणि नवता यांचा छान सुरेख संगम असतो.

भारतमाता चित्रपटगृहाच्या बाबतीत तेच झाले आहे. त्याच्या मूळ इमारतीचा ढाचा अजिबात न बदलता अंतर्गत रचनेत आधुनिक बदल करण्यात आले आहेत. आता डॉल्बी स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम आणि टू के प्रोजेक्शन अशा आधुनिक तंत्रज्ञानासह ते आहे. आजच्या डिजिटल पिढीला चित्रपट म्हणजे फक्त आणि फक्त पडद्यावर गोष्ट पाह्यची नसते तर त्याना काही भन्नाट आणि रंजक अनुभवही घ्यायचा असतो. तसा आधुनिक बदल या नवीन भारतमाता चित्रपटगृहात आहे. आणि त्याची जणू चुणूक आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंदर २' हा चित्रपट येथे देत आहे. भारतमाता चित्रपटगृहाचे नूतनीकरण झाल्यानंतर पहिला चित्रपट हिंदी नव्हे तर मराठी असता तर अधिक सयुक्तिक ठरले असते हे खरेच आहे. त्याचप्रमाणे ढोल ताशा पथक आणून ते व्हायला हवं होतं हेदेखील खरेच.

मराठी चित्रपटाच्या चौफेर आणि दीर्घकालीन गौरवशाली इतिहासात काही चित्रपटगृहाचा विशेष सहभाग आहेच आहे. याचीही दखल घ्यायला हवी. मराठी चित्रपट रुजवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी या अशा चित्रपटगृहाचा विशेष सहभाग आहे. खरं तर एकूणच चित्रपटगृहाचा इतिहास वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे.आणि त्यात एक भारतमाता चित्रपटगृह. आपलं वाटावं असं चित्रपटगृह.

मुंबईतील गिरणगावातील हे चित्रपटगृह. लालबाग, परळ, काळा चौकी, भोईवाडा, भायखळा, सात रस्ता, लोअर परेल या परिसरातील मराठी चित्रपट रसिकांच्या अनेक पिढ्यांसोबत या चित्रपटगृहाची यशस्वी उल्लेखनीय वाटचाल आहे.

कोरोना काळात येथील खेळ थांबला. पण आता नवीन आकर्षक रुपडे घेऊन हे चित्रपटगृह लक्ष वेधून घेत आहे. आज वर्षभरात शंभर सव्वाशे मराठी चित्रपट प्रदर्शित होत असताना त्यांच्यासाठी हे एक हक्काचे असे चित्रपटगृह आहे. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला उच्च दर्जाच्या अत्याधुनिक तांत्रिक सुविधा असलेल्या चित्रपटगृहात चित्रपट पाह्यचा असतो, मल्टीप्लेक्स कल्चरने त्यांना ती सवय लावली आहे, तसा फिल त्यांना नवीन रंगरुप असलेल्या भारतमाता चित्रपटगृहात अनुभवावयास मिळाले तर चित्रपट हाऊसफुल्ल गर्दीत टाळ्या शिट्ट्यानी सुपर डुपर हिट ठरलाच समजा. सोशल मीडियावर या भारतमाता चित्रपटगृहावरचे रिल व्हायरल होत आहे, प्रसार माध्यमातून भारतमाता पुन्हा एकदा सुरु अशा बातम्या येता आहेत, स्फूट येत आहे.

जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एक पडदा चित्रपटगृहात टाळ्या आणि शिट्ट्यांनी "पब्लिकने पिक्चर्स" डोक्यावर घेतले इतकेच नव्हे तर, त्या चित्रपटगृहाशीही कळत नकळत भावनिक नाते निर्माण झाले.चित्रपटाचा अभ्यास करताना हीदेखील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट. चित्रपट कसा आहे हे महत्त्वाचे तसेच तो प्रेक्षकांपर्यंत कसा पोहचला तेदेखील तितकेच महत्त्वाचे. तो एक वेगळाच अनुभव.

दक्षिण मुंबईतील गिरगावात लहानाचा मोठा होताना माझीही काही आवडती सिंगल स्क्रीन थिएटर्स होती, त्यातील






बरीच काळाच्या पडद्याआड गेली. पण आठवणी कायम आहेत. आजच्या ग्लोबल युगातील चित्रपट रसिक मल्टीप्लेक्स, त्याच मल्टीप्लेक्सचे अत्याधुनिक तंत्रज्ञान, साऊंड सिस्टीम,

यू ट्यूब, ओटीटीवर मुव्हीज पाहताहेत. (ही पिढी चित्रपटाला मुव्हीज म्हणते). त्यांना अशा अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या वाटचाल आणि रसिकांच्या प्रेमाची कल्पना असेल अथवा कदाचित नसेलही. आणि काळ कोणासाठीही थांबत नाही, म्हणून तर नवीन गोष्टींचे स्वागत हवेच आहे. जुन्या काळातील चित्रपट रसिकांनी चित्रपटाकडून फक्त आणि फक्त मनोरंजन ,मनोरंजन मनोरंजन याचीच अपेक्षा ठेवली, आजच्या चित्रपट रसिकांना आपण चित्रपट कसा पाहतोय, अद्ययावत सुविधा आहेत ना हे महत्त्वाचे झाले आहे.

मी पहिल्यांदा भारतमाता चित्रपटगृह पाहिले ते लहानपणी पालकांसोबत लालबागचे गणपती पाह्यला जायचो तेव्हा. गणेश गल्लीचा सार्वजनिक गणेशोत्सव हे त्या काळात विशेष आकर्षण असे. तो पाहून झाल्यावर जवळचे भारतमाता चित्रपटगृह दिसायचे. नजर जायचीच. तेथे हमखास मराठी चित्रपट लागल्याचे दिसे. गिरणगावातील अस्सल मराठमोळे चित्रपटगृह ही त्याची ओळख.

अनेक चाळी आणि कष्टकरी कामगार वर्ग हे या विभागाचे वैशिष्ट्य. मध्यमवर्गीय कुटुंबांचे येथे दीर्घकालीन राहणीमान. (आजचे परेल थोडं बदललंय.)

गिरगावातील आमच्या खोताची वाडी

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक


आणि शेजारच्या आंबेवाडी, कुडाळेश्वर वाडीच्या समोरच मॅजेस्टिक थिएटर होते. आयुष्यात पाहिलेले हे पहिलेच सिनेमा थिएटर. मग जवळचे सेन्ट्रल मग रॉक्सी, त्यानंतर ऑपेरा हाऊस वगैरे.

कॉलेजमध्ये असताना दक्षिण मध्य मुंबईतील वरळी नाक्यावरील लोटस, नागपाड्यातील अलेक्झांड्रा, भायखळ्याचे पॅलेस असे एकेक करत अन्य चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहू लागलो आणि मराठी चित्रपट पाहण्यासाठी भारतमाता हुकमी ठरले. गिरगावातून ६१, ६५, ६६, ६९ यापैकी कोणतीही बेस्ट बस पकडून दहा पैशात भारतमाता चित्रपटगृहात पोहचवे. सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात तेथे मी चांदोबा चांदोबा भागलास का, सासुरवाशीण, चोरीचा मामला, शूरा मी वंदिले हे चित्रपट पाहिले. हे कृष्ण धवल अर्थात ब्लँक अ‍ॅण्ड व्हाईट चित्रपट. मराठीत तोपर्यंत रंगीत चित्रपट पडद्यावर येत होते तरीही काही चित्रपट ब्लॅक अँड व्हाईट असत. दादा कोंडके यांचा ' पांडू हवालदार ' ही ब्लॅक अँड व्हाईट असला तरी मनोरंजनाच्या रंग काही वेगळाच.

गिरगावातील मॅजेस्टिक थिएटर हे खरं तर मराठी चित्रपटाचे हुकमी. १९७३ साली ते पाडल्यावर सेन्ट्रलला मराठी चित्रपट प्रदर्शित होवू लागले. पण तेथे मनमोहन देसाई दिग्दर्शित चाचा भतीजा आणि परवरीश, सी. पी. दीक्षित दिग्दर्शित "फकिरा" अशा अनेक सुपर हिट चित्रपटांनी रौप्य महोत्सवी अर्थात पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केल्याने अनेक मराठी चित्रपट आमच्या गिरगावात आलेच नाहीत. अष्टविनायक वगैरे सेन्ट्रलला मॅटीनी शोला आले. रॉक्सीलाही मराठी चित्रपट प्रदर्शित होत. पण भारतमाता, दादरचे प्लाझा व कोहिनूर (आताचे नक्षत्र) मराठीसाठी हुकमी.

मिडियात आल्यावर भारतमाताचे सर्वेसर्वा बाबासाहेब भोपटकर यांच्याशी माझे अतिशय चांगले संबंध निर्माण झाले. अतिशय सज्जन माणूस. अनेक मराठी चित्रपटांचे मुहूर्त अथवा शूटिंग पूर्ण झाल्यावर निगेटिव्ह कटींग त्यांच्या शुभ हस्ते करण्यात येई. त्या काळात मराठी चित्रपटसृष्टीतील वातावरण अतिशय निकोप आणि आपलेपणाचे होते. अनेकांशी सहज संवाद होत असे. त्यातून चित्रपटसृष्टीतील अनेक गोष्टी समजत. अनेक मराठी चित्रपटांचे प्रीमियरही भारतमातामध्ये होत. महेश कोठारे दिग्दर्शित "धूम धडाका"चा जंगी प्रीमियर येथेच रंगला. भारतमाता चित्रपटगृहात आपला मराठी चित्रपट प्रदर्शित व्हावा म्हणून अनेक निर्माते बराच काळ वाटही पाहत याचे किस्सेही बरेच.

भारतमाता जुन्या वळणाचे असले तरी तेथील मराठी ठसा आपलासा वाटे. १९८२ साली गिरणी संप सुरु झाल्यावर भारतमातामधील गर्दी कमी झाल्याच्या बातम्या होत्या. याच वर्षी देशात रंगीत दूरदर्शन व व्हिडिओचे आगमन झाले. सत्यनारायणाची पूजा असो, वाढदिवस असो, बारसं असो, चाळीचाळीतून भाड्याने व्हीसीआर आणून तब्बल चार चित्रपट पाहता येवू लागल्याने चित्रपटगृहात जाणे एकूणच कमी होत गेले. त्यात दादा कोंडके, अशोक सराफ, सुषमा शिरोमणी, लक्ष्मीकांत बेर्डे, महेश कोठारे, सचिन पिळगावकर यांनी मराठी चित्रपटाचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण केला. त्यात राज्यातील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्स हाऊसफुल्ल गर्दीत वाटचाल करत करत मराठी चित्रपटाची वैशिष्ट्य अधोरेखित करत राहिले ( आज त्याचीच गोड फळे मिळताहेत. आजच्या मराठी चित्रपटसृष्टीला



### मल्टीप्लेक्स कल्चर

जवळचं. ) कालांतराने कपिल भोपटकरशी चांगले संबंध निर्माण झाल्यावर भारतमाता अधिकच आपलेसे झाले. मल्टीप्लेक्स युगात मुंबईसह देशातील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्स बंद होत गेली, नवीन पिढीला चकाचकपणाची सवय लागत गेली, काही महाराष्ट्रीय कुटुंबातही नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्ग आला. जुनी चित्रपटगृह चालवणे, टिकवणे, सांभाळणे अवघड होत गेले. काही चित्रपटगृहांनी कात टाकली. ( भायखळ्याचे जयहिंद तसेच बदलले) भारतमाता आता अशाच काही नवीन गोष्टींसह आलं आहे. मुक्ता ए २ यांच्या वतीने ते कार्यरत.

भारतमाता १९४१ साली सुरु झाले. त्या काळातील मराठी व हिंदी चित्रपटांनी ते वाटचाल करत राहिले. तेथे प्रदर्शित झालेले काही मराठी चित्रपट, सुगंधी कट्टा, पुढारी, भाग्यवती मी या संसारी, सून माझी सावित्री, असला नवरा नको ग बाई, अजब तुझे सरकार, सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, मुंबईचा फौजदार, जावई विकत घेणे आहे, तुच माझी राणी, आंधळा मारतो डोळा, जिद्द, सर्वसाक्षी, शूरा मी वंदिले, धरतीची लेकरं, ज्योतिबाचा नवस, पांडू हवालदार, गल्ली ते दिल्ली, गंमत जंमत, मानाचा मुजरा, अष्टविनायक, पुढचं पाऊल, दगा, सगेसोयरे, मला देव भटाला, नाव मोठं लक्षण खोटं, चुडा तुझा सावित्रीचा, बायानों नवरे सांभाळा, तुमची खुशी हाच माझा सौदा, पाहुणी वगैरे अनेक.

कालांतराने सैराटने येथे भरघोस यश प्राप्त केले.

भारतमाताच्या अनेक वैशिष्ट्यांतील आणखीन एक विशेष, अनेक वर्ष तेथे दादा कोंडके यांचे सर्वकालीन सुपर हिट चित्रपट रिपीट रनला प्रदर्शित होत राहिले आणि मागील व पुढील पिढीतील रसिकांनी ते एकत्र एन्जॉय केले. तुमचं आमचं जमलं, आंधळा मारतो डोळा, पांडू हवालदार इत्यादी दादा कोंडकेपटांना पुन्हा पुन्हा मोठ्या पडद्यावर पाह्यचा आनंद भारतमाताने दिला.चित्रपती व्ही.शांताराम दिग्दर्शित "पिंजरा" देखिल काही वर्षांनी येथेच रिपीट रनला प्रदर्शित झाला आणि पूर्वीसारखीच गर्दी

भारतमाता जुन्या मुंबईची ओळख तसेच मराठी चित्रपटाच्या इतिहासाची साक्षीदार, साथीदार वास्तू. ती पुन्हा कार्यरत होतेय तर मलाही पुन्हा जायलाच हवे. मी तर जाणार. मी या चित्रपटगृहाशी "एक सामान्य प्रेक्षक" म्हणून जोडला गेलो आणि तेच घट्ट नाते आजही कायम आहे. सत्तरच्या दशकापासून माझा या वास्तूशी परिचय आहे.

मुंबईतील एकेक करत करत अनेक एकपडदा चित्रपटगृह काळाच्या पडद्याआड गेली. तर काही चित्रपटगृहानी झक्कास कात टाकली. भायखळा येथील जयहिंद, दादर येथील चित्रा, माहिम येथील सिटीलाईट, बोरिवली येथील अजंठा अशा काही चित्रपटगृहाचा विशेष उल्लेख हवा. दादरच्या रानडे रोडवरील कोहिनूर चित्रपटगृहाच्या जागेवर नक्षत्र उभे राहिले.

चित्रपट मोठ्या पडद्यावर पहावा हे चित्रपट रसिक जाणतात, पण चित्रपट त्यांना आवडायला हवा.... आणि चित्रपटगृह झक्कास असेल तर मस्तच. भारतमाता चित्रपट आता तसेच.

मुंबईतील अनेक जुनी एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स अशी कात टाकून नव्याने सुरू झाली तर त्यात आनंद आहेच. तसेच त्यामुळे त्या जुन्या चित्रपटगृहाचा फ्लॅशबॅकही समोर येईल हेदेखील एक वैशिष्ट्य आहे.


---

# ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक डॉ. नागनाथ कोतापल्ले

साठोत्तरीच्या कालखंडात कविता, कथा, दिर्घकथा, कादंबरी, ललित गद्य आणि समिक्षा अशा विविध वाङ्‌मय प्रकारात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी दर्जेदार साहित्य निर्मिती केली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक अशी डॉ. नागनाथ लालूजीराव कोतापल्ले यांची ओळख राहिली आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २९ मार्च १९४८ रोजी मुखेड (जि. नांदेड) येथे त्यांचा जन्म झाला होता.

नागनाथ कोतापल्ले यांचे महाविद्यालयीन शिक्षण देगलूर येथे झाले. बीए आणि एमए या दोन्ही परीक्षांत मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. ते कुलपतींच्या सुवर्णपदकाने सन्मानित झाले होते. 'शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध लिहून त्यांनी १९८० साली पीएचडी पदवी संपादन केली. बीड येथील महाविद्यालयात १९७१ ते १९७७ या काळात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून काम केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये त्यांनी अधिव्याख्याता आणि प्रपाठक या पदांवर १९७७ ते १९९६ या काळात काम केले.

यानंतर नागनाथ कोतापल्ले हे पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५पासून २०१०पर्यंत कोतापल्ले मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. व्यासंगी, अध्यापनकुशल, उपक्रमशील आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. डॉ. बाबासाहेब



आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक आणि पुणे विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक या पदांवरून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

नागनाथ कोतापल्ले यांनी राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बालपुरस्कार समिती आणि एसएससी बोर्डाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनदेखील काम केले आहे. कोतापल्ले हे १९८८ ते ९५ या काळात मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह, १९९५ ते ९६मध्ये साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या मराठी वाङ्‌मयकोशाचे समन्वय संपादक होते. 'प्रतिष्ठान' या नियतकालिकाचे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले आहे, तर राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते.

श्रीगोंदा येथे १९९९ साली झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आणि २००५ साली जालना येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे कोतापल्ले अध्यक्ष होते. चिपळूण येथे २०१२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. डॉ.नागनाथ लालूजीराव कोत्तापल्ले यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे साहित्य**

- **'मूड्स' (कवितासंग्रह)**
- **'कर्फ्यू आणि इतर कथा', 'रक्त आणि पाऊस', 'संदर्भ', 'कवीची गोष्ट', 'सावित्रीचा निर्णय', 'देवाचे डोळे' (कथासंग्रह)**
- **'राजधानी' (दीर्घकथा संग्रह)**
- **'मध्यरात्र', 'गांधारीचे डोळे', 'प्रभाव' (कादंबरी)**
- **'पापुद्रे', 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध', 'नवकथाकार शंकर पाटील', साहित्याचा अन्वयार्थ', 'मराठी कविता : एक दृष्टिक्षेप', 'साहित्याचा अवकाश' (समीक्षात्मक)**
- **'गावात फुले चांदणे' (प्रौढ नवसाक्षरांसाठी लघुकादंबरी)**
- **'मराठी साहित्य संमेलने आणि सांस्कृतिक संघर्ष', 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी' (ललित गद्य)**
- **'जोतीपर्व' (अनुवादित पुस्तक)**
- **'स्त्री-पुरुष तुलना', 'शेतकऱ्यांचा असूड', 'पाचोळा आणि दहा समीक्षक', 'निवडक बी रघुनाथ' (संपादन) पाच पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार**

---


# विनोदी कथा लेखनकार बाळ गाडगीळ

जवळपास पन्नास वर्षे प्राधान्याने विनोदी कथालेखन करणारे बाळ गाडगीळ यांचा आज जन्मदिन आहे. त्यांचा जन्म २९ मार्च १९२६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील अणसुरेमध्ये येथे झाला . झाला. कौटुंबिक आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने स्वतःच्या पायावर उभे राहत पुढील सर्व उच्च शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठात अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी घेऊन भारतीय प्रशासनिक सेवा (आय.ए.एस) आणि मध्यवर्ती सेवा परीक्षा उत्तीर्ण (१९५१) झाले. अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापीठात (१९६३) शिक्षण व नोकरी केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून मुंबई, पुणे, सांगली येथे काम केले. सांगलीच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स व पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून दीर्घकाळ काम करीत असताना प्रशासनाचाही मोठा अनुभव मिळाला. शिक्षण क्षेत्रातील वेगळा प्रयोग म्हणून ओळखल्या जाणार्या 'सिम्बॉयसीस' या शिक्षणसंस्थेचे प्रथम शिक्षण सल्लागार, विद्यमान उपाध्यक्षपदी कार्यरत होते.

गाडगीळांचा अध्ययन व अध्यापन याचा विषय अर्थशास्त्र हा असल्याने या विषयावर त्यांनी क्रमिक पुस्तके लिहिली असून अर्थशास्त्र विषयक राष्ट्रीय व जागतिक नियतकालिकांमधूनही विपुल लेखन केले . अर्थशास्त्र विषयक अनेक परिषदांमध्येही ते सहभागी झाले . उत्तम वक्ते, कथाकार, कादंबरीकार, प्रवासवर्णनकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या गाडगीळांनी 'वळचणीचे पाणी' (२००१) हे आत्मचरित्र लिहिले असून त्यात कोकणातील दारिद्र्य आणि त्यावर मात करून स्वतःचे स्वतंत्र विश्व निर्माण करणार्या पांढरपेशा वर्गाचे दर्शन घडते. अनेक अनुकूल-प्रतिकूल वाटा, वळणांचा शोध घेत हे वळचणीचे पाणी कसे प्रवाहित राहिले, त्याचा प्रवाही वेध गाडगीळ यांच्या या आत्मचरित्रातून घेतलेला जाणवतो. बर्या-वाईट अनुभवांबरोबरच यातून काही व्यक्तिचित्रे (विशेषतः त्यांच्या आईचे) चांगल्या रितीने साकारली.

गाडगीळ यांनी मराठी साहित्यसृष्टीत विनोदी कथाकार म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या या कथा बहुतांश मध्यमवर्गीय मानसिकतेवर बेतल्या असल्या आणि चिं. वि. जोशी यांचा प्रभाव त्या कथांवर जाणवत असला; तरी वेगळी शैली, अनुभवांचे वैविध्य, रोचक भाषा यांमुळे त्या स्वतंत्र अंगाच्या, वेगळ्या ढंगाच्या झाल्या . समाजातील व्यथा, वेदना, विसंगती, कारुण्य, स्वार्थ अशा अनेक गोष्टींना गाडगीळांच्या कथालेखनातून नेमकेपणाने स्थान मिळाले.

'विनोद केवळ हसण्यावारी नेण्याची गोष्ट नाही. त्यामागे एक जीवनदृष्टी आहे', अशी भूमिका घेऊन त्यांनी सर्व



अंगांनी विनोद विवेचन केले असून इतर विनोदी साहित्याबद्दल गाडगीळांचा दृष्टिकोन स्वागतशील म्हणावा लागेल. गाडगीळांच्या बहुतेक पुस्तकांना त्या-त्या वेळच्या मान्यवर समीक्षकांच्या आस्वादक प्रस्तावना आहेत. त्यांत वा. ल. कुलकर्णी, म. द. हातकणंगलेकर यांचा समावेश आहे. वकिलांचे विनोद, राजकारण्यांचे विनोद, डॉक्टरांचे विनोद, स्कॉच लोकांचे विनोद, आयरिश विनोद, वेड्यांचे विनोद अशा विविध प्रकारच्या विनोदांचा त्यांनी संकलित केलेला पाच पुस्तकांचा संच लोकप्रिय झाला होता.

'सिगरेट आणि वसंत ऋतू' या त्यांच्या अमेरिकेच्या प्रवासवर्णनाला शासनाचं प्रथम पारितोषिक मिळालं होतं. सिगारेट आणि वसंतऋतु' या वेगळ्या प्रकारच्या प्रवासवर्णनातून अमेरिकेचे खेळकर, प्रसन्न आणि तरीही चिंतनशील दर्शन घडते. 'दुपारच्या सावल्या'मधून त्यांनी लिहिलेली वेचक व वेधक व्यक्तिचित्रे समोर येतात. त्याचप्रमाणे लोटांगण आणि अन्य काही पुस्तकानाही महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे 'शतकातील साहित्यिक' म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

आकार आणि रेषा, अखेर पडदा पडला, अमेरिकेत कसे मरावे, आम्ही भूगोल घडवतो, बबनरावांना शिंगे फुटतात, बॉबी डार्लिंगचे पलायन, बोका शिंके आणि काकवी, चिमणरावाचा नवा अवतार, चोर आणि मोर, दुसरा चिमणराव, एक चमचा 'पुलं', एक चमचा अत्रे, फिरकी, हसत खेळत, हसायचं नाही, हसो हसो, हट् म्हणताच गरिबी हटली, होश्शियार निगा रख्खो, माशाचे अश्रू, पाटलांची पीए, शीरसलामत, थ्रील, तू तिथं मी? अजिबात नाही, गप्पागोष्टी, घण एक पुरे प्रेमाचा, मधात तळलेले बदक अशी त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. प्रा. हातकणंगलेकर यांनी 'प्रसन्न शैली आणि हृद्य, खुबीदार, निर्विष विनोदबुद्धी' अशा शब्दांत गाडगीळांबद्दल लिहिले आहे.

बडोदे येथे झालेल्या मराठी वाङ्मय परिषदेचे अध्यक्षपद गाडगीळ यांनी भूषविले होते.

मुंबईत १९९२ साली भरलेल्या विनोदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

कोथरूड येथे १९९५ साली झालेल्या कोथरूड साहित्य संमेलनाचेही ते अध्यक्ष होते.

त्यांचे २१ मार्च २०१० रोजी पुण्यात दुःखद निधन झालं. **(साभार - इंटरनेट)**

# जादूटोणाविरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करा

## अंनिस कर्जत शाखेची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

जादूटोणा विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करा. यासाठी नाशिक येथील भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि महिलांच्या शोषणाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कर्जत शाखेच्या वतीने तहसीलदारां मार्फत जिल्हाधिकारी तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कर्जत शाखेचे अध्यक्ष विलास सांगळे, उपाध्यक्ष अनिल थोरवे, कार्याध्यक्ष सूर्यकांत भुतावळे, प्रधान सचिव विकास वाल्हे, सोशल मीडिया कार्यवाह रोहिदास लोभी, विजय कोंडीलकर, श्रीकांत हावरे तसेच जळगाव जिल्हा कार्याध्यक्ष प्रल्हाद बोऱ्हाडे आदींनी तहसीलदार दो. धनंजय जाधव यांची भेट घेऊन जादूटोणा विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करा. असे निवेदन दिले.

या निवेदनात नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या या प्रकरणाने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले असून, समाजातील भीती, असुरक्षितता आणि विविध समस्यांचा गैरफायदा घेत तथाकथित अध्यात्म, ज्योतिष व दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांसह सामान्य नागरिकांचे शोषण कसे केले जाते. याचे गंभीर चित्र समोर आले आहे.

या प्रकरणातून हे स्पष्ट होते की अशा प्रकारची बुवाबाजी केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसून त्यामागे सामाजिक मान्यता, आर्थिक स्वार्थ आणि काही वेळा राजकीय तसेच प्रशासकीय स्तरावरील अप्रत्यक्ष संरक्षण असण्याची शक्यता असते. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केवळ आरोपी पुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण जाळ्याचा शोध घेण्याची गरज असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

अंनिसच्या वतीने शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. या प्रकरणाचा निष्पक्ष व व्यापक तपास करावा, जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. फलज्योतिषाचा कायद्यात समावेश करावा. पीडित महिलांची ओळख गोपनीय ठेवून त्यांचे संरक्षण करावे. संभाव्य राजकीय संबंधांची चौकशी करावी. सर्व पक्षांनी आचारसंहिता तयार करावी. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारासाठी राज्यस्तरीय जनजागृती मोहीम राबवावी.

याशिवाय अशा प्रकारची प्रकरणे इतर जिल्ह्यांतही अस्तित्वात असल्यास त्यांचा राज्यव्यापी तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. हे प्रकरण केवळ एक गुन्हेगारी घटना नसून अंधश्रद्धा, सत्तेचा गैरवापर आणि महिलांवरील अत्याचार यांचा संगम असल्याने यावर तात्पुरत्या कारवाईऐवजी दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजना आवश्यक असल्याचे मत निवेदनात व्यक्त करण्यात आले आहे.

श्रद्धा ही वैयक्तिक बाब असली तरी तिच्या नावाखाली होणारे शोषण, फसवणूक आणि अत्याचार सहन केले जाणार नाहीत. अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी अंत करण्यासाठी समाज, शासन आणि राजकीय यंत्रणांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा. अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली.

# पशुपालनातून उभारा आर्थिक बळ; शासनाच्या योजनेचा लाभ घ्या!



**पाली : प्रतिनिधी**

शेतीपूरक व्यवसायांना चालना देत ग्रामीण अर्थकारण सक्षम करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाची 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन आणि कुक्कुटपालन या क्षेत्रात नव्याने व्यवसाय उभारण्यासाठी ही योजना मोठा आधार ठरत असून, पात्र लाभार्थ्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे.

या योजनेत पारंपरिक स्वरूपापेक्षा पुढे जात केवळ जनावरांचे वाटप न करता शेड उभारणी, विमा संरक्षण आणि आधुनिक उपकरणांसाठीही भरीव आर्थिक मदत दिली जाणार आहे. त्यामुळे पशुपालकांना उद्योगाच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी उपलब्ध होत आहे.

राज्यस्तरावर राबविण्यात येणाऱ्या घटकांमध्ये ५ दुधाळ जनावरांच्या गटासाठी सुमारे ११.३५ लाखांचा प्रकल्प, शेळी-मेंढी पालनासाठी ५० माद्या व ५ नर गटासाठी ११.३८ लाखांचा प्रकल्प तसेच ५ हजार अंडी उत्पादक पक्ष्यांच्या कुक्कुटपालनासाठी ३० लाखांपर्यंतचा प्रकल्प समाविष्ट आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के, तर अनुसूचित जाती-जमातींसाठी ७५ टयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे.

लाभार्थी निकष- अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, वनहक्कधारक आणि महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाणार आहे. महिलांसाठी ३० ते ५० टक्के तर दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. स्वतःची जमीन किंवा किमान पाच वर्षांचा भाडेपट्टा आवश्यक आहे.

***जिल्हास्तरीय उपक्रम***

***दुधाळ गाय/म्हैस वाटप व तीन वर्षांचा विमा, शेळी-मेंढी गट (५+१ / १०+१) विम्यासह, ५०० सुधारित देशी कुक्कुट पक्ष्यांचे वाटप, वैरण विकासासाठी विविध योजना, चारा बियाणे १००% अनुदानावर, हायड्रोपोनिक चारा उत्पादन, मिनी टीएमआर व कडबा कुट्टी यंत्रासाठी अनुदान, कालवड/पारडू पोषण योजना, नर पारडू संवर्धनम बैलजोडी खरेदीसाठी मदत***

**पारंपरिक शेतीसोबत पशुपालनाचा उद्योग विकसित करणे काळाची गरज आहे. ही योजना पशुपालकांना स्वावलंबी व उद्योजक बनविणारी आहे. रायगड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.**

**- डॉ. सचिन देशपांडे,**
**जिल्हा उपायुक्त,**
**पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**

## खालापूरात फ्लॅट मालकाची फसवणुक

**खोपोली : प्रतिनिधी**

तोतया इसम उभा करून बनावट दस्त नोंदणी करून फ्लॅटची विक्री केल्याची घटना खालापूरात घडली आहे.

प्रकाश जैन यांचा खालापूर हद्दीत ताकई येथे फ्लॅट आहे. त्यांच्या नकळत राजीव आणि कन्हैया यांनी तोतया इसम उभा करत प्रकाश यांचे नावाचे बनावट आधारकार्ड व पॅनकार्ड बनवले.त्याआधारे खोटा दस्त तयार करून दुय्यम निबंधक कार्यालय खालापूर येथे खोटी व बनावट दस्त नोंदणी करून फ्लॅटची विक्री केली.

फसवणुकीचा प्रकार जैन यांना कळल्यानंतर त्यांनी तक्रार अर्ज दिला होता या तक्रारीची शहानिशा करून खालापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# श्रीवर्धनच्या लुबना काझी चौधरी न्यूजर्सीच्या प्रशासकीय कायदा न्यायाधीश

**श्रीवर्धन : रामप्रहर वत्त**

कोकणच्या मातीतील कर्तृत्वाने आज सातासमुद्रापार मोठी भरारी घेतली आहे.रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील कन्या लुबना काझी चौधरी यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहास रचत अमेरिकेतील न्यू जर्सी राज्याच्या प्रशासकीय कायदा न्यायाधीश (Administrative Law Judge) पदावर नियुक्ती मिळवली आहे. विशेष म्हणजे, या महत्त्वाच्या पदावर विराजमान होणाऱ्या त्या विभागातील पहिल्या महिला ठरल्या आहेत.

एका सामान्य कुटुंबातून प्रवास सुरू करून आंतरराष्ट्रीय स्तरावर न्यायव्यवस्थेत मानाचे स्थान मिळवणे ही त्यांच्या जिद्दीची, मेहनतीची आणि चिकाटीची साक्ष आहे.लुबना चौधरी यांनी शिक्षण आणि करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर उत्कृष्टता सिद्ध केली. कठोर परिश्रम, अभ्यासू वृत्ती आणि समाजाभिमुख दृष्टीकोन यांच्या जोरावर त्यांनी अमेरिकेच्या न्यायव्यवस्थेत आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या या नियुक्तीमुळे भारतीय महिलांची आणि विशेषतः ग्रामीण भागातील मुलींची क्षमता पुन्हा अधोरेखित झाली आहे.स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था, यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

# युद्धाचा घाव कलिंगडावर ; निर्यात ठप्प, कडक उन्हात माणगावच्या शेतकऱ्यांचे स्वप्न करपले



**माणगाव : प्रतिनिधी**

तीन महिने राबून, कर्ज काढून, आशेच्या धाग्यावर उभी केलेली शेती आणि एका अनपेक्षित संकटाने सगळं काही डोळ्यां समोर उद्ध्वस्त. माणगाव तालुक्यातील न्हावे गावचे शेतकरी संजय तेटगुरे यांची ही कहाणी आज हजारो कलिंगड उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा बनली आहे. गेल्या १० ते १२ वर्षांपासून कलिंगडाची शेती करणाऱ्या तेटगुरे यांनी यंदा दुसऱ्याची तब्बल ६ एकर जमीन भाड्याने घेऊन 'सुप्रीम', अशा उच्च प्रतीच्या वाणांची लागवड केली. परदेशात मोठी मागणी असलेल्या या पिकासाठी त्यांनी बियाणे, मशागत, मजुरी यावर सुमारे साडेचार लाख रुपयांचा खर्च केला. डिसेंबर अखेरीस पेरणी झाली आणि काही महिन्यांतच पीक बहरायला लागले.

पण त्याच वेळी जगात युद्ध भडकले आणि सगळं चित्र पालटलं. तर काही शेतकऱ्यांनी गोल्डन', 'सिंबा', 'कृती' शुगर बेबी, अशा विविध कलिंगडाच्या वाणाच्या पिकाची लागवड केली होती. सुप्रीम कलिंगड जातीच्या वाणाच्या पिकाला परदेशात मोठी मागणी आहे. युद्धामुळे परदेशी निर्यात पूर्णतः बंद झाली. ज्या बाजारपेठेवर येथील शेतकरी अवलंबून होते, तीच बाजारपेठ एका क्षणात कोसळली. त्यातच निसर्ग ही कोपला त्यामुळे रखरखत्या कडक उन्हात माणगावच्या शेतकऱ्यांचे स्वप्नही करपले. दरवर्षी ८ ते १० हजार रुपये टन दराने विक्री होणारे कलिंगड यंदा शेतातच पडून राहिले. आणि माणगावातील कलिंगड उत्पादन घेणारे शेतकरी ढसाढसा या पिकाकडे बघून रडू लागले. वर्षभर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचा कसा ? हा घन प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिल्याने दिवसा किजवे चमकू लागले.

शहरी व स्थानिक व्यापाऱ्यांनीही या पिकाच्या खरेदी कडे पाठ फिरवली. शेतात ढीग लागलेली कलिंगडे आणि उन्हात पिवळी पडलेली, करपलेली फळे हा सारा देखावा शेतकऱ्यांच्या हतबलतेची साक्ष देतो. "दरवर्षी दोन ते तीन लाख रुपये निव्वळ उत्पन्न मिळायचं यंदा खर्चही निघाला नाही. आता खायचं काय ?" असा सवाल संजय तेटगुरे यांच्या डोळ्यांतूनच स्पष्ट दिसत होता. युद्धाचा परिणाम इतका खोलवर जाईल, याची सुत मात्र कल्पनाही शेतकऱ्यांना नव्हती. परदेशी बाजारपेठ ठप्प झाली आणि स्थानिक बाजारात मागणीच उरली नाही. त्यातच कडक उन्हाने पिकावर घाला घातला. जे थोडंफार विक्रीयोग्य होतं, तेही उन्हात करपून गेले. माणगाव तालुक्यात सुमारे ८०० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर कलिंगडाची लागवड झाली आहे. हा तालुका आता कलिंगड उत्पादनासाठी ओळखला जाऊ लागला होता. मुंबई, वाशी, पुणे आणि परदेशात मोठ्या प्रमाणात येथून कलिंगड पाठवले जात होते. पण यंदा संपूर्ण साखळीच तुटली. ही केवळ एका शेतकऱ्याची नाही, तर संपूर्ण कोकणातील शेतकऱ्यांची शोकांतिका आहे. कर्ज काढून शेती करणारा शेतकरी आज कर्जबाजारी झाला आहे. नगदी पीक म्हणून पाहिलेल्या कलिंगडानेच त्याला आर्थिक संकटात ढकलले आहे. याहून दुर्दैवी बाब म्हणजे, भात, कडधान्य, आंबा, काजू यांसारख्या पिकांना विमा संरक्षण शासनाकडून मिळते; मात्र कलिंगडा सारख्या नगदी पिकासाठी कोणतीही सुरक्षा नाही. त्यामुळे नुकसान झाल्यावर शेतकरी पूर्णपणे वाऱ्यावर सोडला जातो.

कोकणातील शेतकरी आधीच निसर्गावर अवलंबून. डोंगरदऱ्यांतील, वरकस जमिनीवर कसाबसा संसार चालवणारा हा शेतकरी कधी निसर्गाच्या, तर कधी मानवनिर्मित संकटांच्या तडाख्यात सापडतो. यंदा युद्ध आणि उष्णतेच्या दुहेरी फटक्याने त्याची कंबरडेच मोडली आहे. अशा गंभीर परिस्थितीतही शासनाची भूमिका मात्र संशयास्पद आणि उदासीन दिसत आहे. नुकसानीचे पंचनामे, तातडीची मदत, विमा संरक्षण याबाबत कोणतीही ठोस भूमिका स्पष्ट झालेली नाही. शेतकरी रडत आहे, पिकं सडत आहेत, कर्ज वाढत आहे. आणि शासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप संतप्त शेतकरी करत आहेत. आज प्रश्न फक्त नुकसान भरपाईचा नाही, तर अस्तित्वाचा आहे. वर्षभर कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, मुलांचं शिक्षण कसं चालवायचं, कर्ज कसं फेडायचं या प्रश्नांनी शेतकरी हैराण झाला आहे. कोकणातील या कलिंगड उत्पादकांचा आक्रोश एकच सुरू आहे "आमचं पीक वाचलं नाही, पण आम्हाला तरी वाचवा !" याच विवेंचनेत आहे.

## सार्वजनिक सूचना

तीर्थराज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
नोंदणी क्र.: NBOM/CIDCO/HSG/TC/9525/JTR/2022&23
पत्ता : प्लॉट क्र. ५बी, इमारत क्र. १ ते २०, सेक्टर-०९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), जि. रायगड - ४१०२०६

### पुनर्विकास प्रकल्पाकरिता – व्यावसायिकांची नियुक्ती

अर्ज/अभिरुची पत्रे/बंद लिफाफ्यातील कोटेशन सादर करण्याबाबत सूचना
एकूण गृहनिर्मिती युनिट्स / फ्लॅट्स: ३२० (सीआयडीसीओमार्फत बांधकाम)

तीर्थराज सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्या. यांच्या प्रस्तावित पुनर्विकास कामासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० तसेच कलम ७९ए अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार खालील पदांसाठी नामांकित व अनुभवी व्यावसायिकांकडून अर्ज/अभिरुची पत्रे/बंद लिफाफ्यातील कोटेशन मागविण्यात येत आहेत :

अनुसूची क्र. १
पुनर्विकास प्रकल्पाकरिता कायदेशीर सल्लागार (लीगल ॲडव्हायझर) नियुक्ती – कार्याचा आवाका :
पात्रता :
- निविदा दस्तावेज, विकास करार, कायमस्वरूपी पर्यायी निवास करार (PAAA) तयार करणे किंवा त्यांची कायदेशीर पडताळणी करणे.
- कलम ७९A नुसार पुनर्विकास प्रक्रियेविषयी व्यवस्थापन समिती व सर्वसाधारण सभेला मार्गदर्शन करणे.
- सोसायटीच्या मालमत्तेचे हक्क व कागदपत्रांची पडताळणी.
- निबंधक कार्यालय, महापालिका तसेच इतर शासकीय विभागांसमोर सोसायटीचे प्रतिनिधित्व करणे.
- पुनर्विकास व सोसायटी संबंधित कायदेशीर बाबींवर सल्ला देणे.
- कायदेशीर नोटिसा, करार, ठराव वइतर कायदेशीर दस्तावेज तयार करणे.
- आवश्यकतेनुसार वाद/खटले यांसंबंधी कायदेशीर मार्गदर्शन करणे.

- मुंबई/नवी मुंबई/ MMRDA परिसरात मालमत्ता कायदे व पुनर्विकास क्षेत्रात किमान ५ वर्षांचा अनुभव.
- किमान ३ सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या पुनर्विकास प्रकल्पांचे काम हाताळलेले असावे.
- पुनर्विकास संदर्भातील कायदेशीर दस्तावेजीकरण व नियमपालनाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

अनुसूची क्र. २ प्रकल्प वास्तुविशारद (आर्किटेक्ट) नियुक्ती – कार्याचा आवाका :
- सोसायटीच्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी व्यवहार्यता अहवाल (Feasibility Study) करणे.
- गरजेनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्यात सोसायटीला मदत करणे.
- निविदा दस्तावेज तयार करण्यात व विकासक निवडण्यात सोसायटीला सहाय्य.
- कलम ७९A नुसार पुनर्विकास प्रक्रियेसाठी व्यवस्थापन समिती व सभेला मार्गदर्शन.
- जमिनी व इमारतीचा सर्व्हे, कागदपत्रे जागेवरील हक्क, उपलब्ध FSI/TDR यांचा अभ्यास करून ७९A मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वास्तववादी प्रकल्प अहवाल तयार करणे.

पात्रता :
- मुंबई/नवी मुंबई/ MMRDA परिसरात किमान ३ वर्षे पुनर्विकास प्रकल्पांचा अनुभव.
- समान प्रमाणातील किमान ३ पुनर्विकास प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केलेले असावेत.
- वास्तुकलेच्या परिषदेत (Council of Architecture) वैध नोंदणी असणे आवश्यक.
- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७९। नुसार पुनर्विकासाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

अनुसूची क्र. ३ – CIDCO कडील पूरक भाडेपट्टा करार (Supplementary Lease Deed) नोंदणीसाठी कायदेशीर मार्गदर्शक नियुक्ती
कार्याचा आवाका :
- सोसायटीच्या विद्यमान भाडेपट्टा कराराची व इतर मालमत्तेच्या कागदपत्रांची तपासणी.
- CIDCO च्या नियमांनुसार पूरक भाडेपट्टा करार तयार करणे.
- आवश्यक कागदपत्रे, अर्ज व इतर नियमांचे पालन करण्यात सोसायटीला मदत करणे.
- पूरक भाडेपट्टा कराराची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास सहाय्य करणे

पात्रता :
- मालमत्ता कायद्याचा मुंबई/नवी मुंबई/MMRDA परिसरात किमान ५ वर्षांचा अनुभव.
- CIDCO भाडेपट्टा / पूरक करार विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य

सर्व अर्जदारांसाठी सार्वत्रिक सूचना:
- इच्छुक कायदे विषयक संस्था/वैयक्तिक वकील/वास्तु-कार्यालयांनी आपले अर्ज/प्रस्ताव/कोटेशन बंद लिफाफ्यात खालील कागदपत्रांसह सादर करावेत :
- सविस्तर प्रोफाईल व अनुभवाची माहिती
- आवश्यक आधारपत्रे (कामाचे आदेश, पूर्णता प्रमाणपत्रे, नोंदणी प्रमाणपत्रे इ.)
- व्यावसायिक शुल्क/मानधनाचा तपशील
- सर्व अर्ज वरील सोसायटी कार्यालयाच्या पत्त्यावर, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत पोहोचावेत.
- अधिक माहितीसाठी किंवा अटी व शर्थी जाणून घेण्यासाठी सोसायटी कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा किंवा खालील संपर्क क्रमांकावर संपर्क करावा–
  सचिव – ९६१९५ ९५००३
  अध्यक्ष – ९८३३४ ४०४८६
- सोसायटीस कोणताही अर्ज/कोटेशन मंजूर करण्याचा किंवा पूर्ण अधिकार असून याबाबत कोणतेही कारण देण्याचे बंधन राहणार नाही

संस्थेच्या वतीने,
तीर्थराज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

परिशिष्ट-३
(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड
ई-मेल :- eerid24@gmail.com दुरध्वनी क्र.०२१४०/२५०८५७

**ई-निविदा सूचना क्र.९२ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. (G.S.T., Insurance & Royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कासाडी नदीचे पुनरुज्जीवन करणेकरीता नदी पात्राचे पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढविणे, नदी प्रदुषण रोखणे व पाण्याचा पुनर्वापर करणेचे करीता आवश्यक ठिकाणी कासाडी नदीला बंधारा क्र.१, २, ३ व ४ बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ३,११,४६,२३४/- | १,१६,००० | १२ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |

**निविदा उपलब्ध कालावधी** दि. २७/०३/२०२६ ते दि. ०३/०४/२०२६

**निविदा उघडण्याचा** दि. ०६/०४/२०२६

खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल eerid24@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

**टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

**सही/-**
**(इंजि मिलींद पवार)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.**

आरओसी-२०२५-२६/क्र-5/सी ६८७५

# ८१ कोटी थकीत मालमत्ता कर जमा

## १५ हजारांहून अधिक थकबाकीदारांनी घेतला अभय योजनेचा लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी सुरू करण्यात आलेल्या अभय योजनेची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी, रात्री १२ वाजेपर्यंत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे ३ दिवस शिल्लक असून अद्यापही ज्या थकबाकीदारांनी मालमत्ता कर भरला नाही त्यांनी तो ३१ मार्च २०२६ पर्यंत भरावा, असे आवाहन आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ७५५ कोटी रुपये मालमत्ताकर जमा झाला असून आतापर्यंत २ लाख १४ हजार ९०० मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरला आहे. यापैकी ६१.५ टक्के मालमत्ताधारकांनी ऑनलाईन तर ३८.५ टक्के मालमत्ताधारकांनी ऑफलाईन पद्धतीने कर भरला आहे.

याशिवाय मालमत्ताकर अभय योजनेचा लाभ घेत १५ हजार ९२ थकबाकीदारांनी



एकूण ८१ कोटी ३४ लाख ४९ हजार ६८९ रुपये मालमत्ता कर भरला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने जाहीर केलेल्या अभय योजनेस नागरिकांचे चांगले सहकार्य लाभत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ संपण्यासाठी अवघे ३ दिवस शिल्लक राहिल्याने महानगरपालिकेच्या मालमता कर विभागाने मालमत्ता कर वसूलीची मोहिम अधिक गतीमान केली आहे.

नागरिकांना कर भरणे सोयीचे व्हावे यादृष्टीने साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी व सोमवारी (३० मार्च) देखील महानगरपालिकेची कर संकलन केंद्रे सकाळी १० ते सायंकाळी ७ तसेच ३१ मार्च २०२६ या दिवशी सकाळी १० ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. नोकरदार वर्गास आणि सर्वसामान्य नागरिकांना या सुविधेमुळे सुट्टीच्या दिवशीही कर भरणे सुलभ होणार आहे.

महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने यावर्षी कर वसुलीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. ऑनलाईन पेमेंट प्रणाली तसेच विविध डिजिटल माध्यमांद्वारे नागरिकांना कर भरण्यासाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासोबतच, कर भरण्याबाबत एसएमएस, नोटीस व प्रत्यक्ष भेटीद्वारे नियमित पाठपुरावा करण्यात आल्याने वसुलीच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. याशिवाय मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी अभय योजना जाहीर करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत निवासी, अनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांच्या मालमत्ता कराची थकबाकी एकरकमी भरल्यास संबंधित मालमत्ताधारकांना विलंब शास्तीवर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२०२६ पर्यंतची संपूर्ण थकबाकी निर्दिष्ट कालावधीत एकरकमी भरणे आवश्यक असून या योजनेचा लाभ घेण्याची अखेरची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी, रात्री १२ वाजेपर्यंत आहे.

### नागरिकांना आवाहन

*नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी शेवटचे ३ दिवस शिल्लक राहिले आहेत. या योजनेंतर्गत थकीत मालमत्ता कर एकरक्कमी भरल्यास विलंब दंडावर ५०% सवलत दिली जात आहे. या योजनेला नागरिकांचा उत्साही चांगला प्रतिसाद मिळत असून अनेक थकबाकीदार मालमत्ताधारकांनी आतापर्यंत याचा लाभ घेतला आहे. त्यामुळे उर्वरित नागरिकांनीही ही संधी न दवडता त्वरित कर भरावा, असे आवाहन करण्यात येत आहे.*

# पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्तीचे तातडीने वितरण करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्तीचे वितरण अद्याप झाले नसल्यामुळे गरीब व गरजू पात्र विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिष्यवृत्तीचे तातडीने वितरण करण्यात यावे, अशी मागणी नवी मुंबई परिवहन समिती सभापती विकास झंजाड यांनी महापौर सुजाता पाटील यांच्याकडे केली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिष्यवृत्ती ही अत्यंत महत्त्वाची बाब असून, तिच्या विलंबामुळे अनेक विद्यार्थ्यांना चालू वर्षाची शाळा व महाविद्यालयाची फी तसेच खासगी क्लासेसची फी भरणे कठीण झाले आहे. आर्थिक अडचणींमुळे काही विद्यार्थ्यांचे शिक्षणही खंडित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मागणी करताना झंजाड यांनी नमूद केले की, शिष्यवृत्तीचे वेळेत वितरण झाल्यास गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निधी वितरित करावा, अशी विनंती करण्यात आली.यावर महापौरांनी सकारात्मक प्रतिसाद देत शिष्यवृत्तीचे वितरण लवकरात



लवकर करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये काही प्रमाणात दिलासा निर्माण झाला आहे.

दरम्यान, पालक व विद्यार्थी वर्गाकडूनही प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून शिष्यवृत्ती वितरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# उलवे येथे रामनवमीनिमित्त धार्मिक सोहळा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लाभली उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामनवमीच्या पवित्र निमित्ताने इस्कॉन चौपाटी, उलवे मंडळ (ISKCON Chowpatty Ulwe Congregation) यांच्या वतीने रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स क्लब येथे भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती लाभली. सोबत अपूर्व ठाकूर आणि आदित्य ठाकूर उपस्थित होते.





या सोहळ्यास सुमारे ३०० ते ४०० भाविकांनी उपस्थिती लावून भक्तीमय वातावरण निर्माण केले. रामनवमी हा भगवान श्रीरामांच्या जन्मोत्सवाचा दिवस असून देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात भगवंतांच्या अभिषेकाने करण्यात आली. त्यानंतर लहान मुलांनी सादर केलेले भक्तीमय नाट्यप्रयोग उपस्थितांचे मन जिंकून गेले. पुढे रामकथा सादर करण्यात आली, ज्यातून श्रीरामांच्या जीवनातील आदर्श आणि संस्कार यांचा संदेश देण्यात आला. यानंतर छप्पन भोग अर्पण करण्यात आला आणि शेवटी महा आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण परिसरात भक्ती, आनंद आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. हा सोहळा दरवर्षी इस्कॉन चौपाटी यांच्या प्रेरणेने गौर पूर्णिमा व रामनवमी उत्सव म्हणून आयोजित केला जातो.

# महात्मा गांधी विद्यालयातील ५० गरजू मुलींना मोफत सायकलींचे वितरण

**उरण : वार्ताहर**

हाशिवरे येथील हितवर्धक मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते नववी मधील ५० गरजू मुलींना मंगळवारी (दि.२४) भारतीय स्टेट बँक हाशिवरे शाखेच्या सी.एस.आर. फंडातून सायकलींचे वितरण करण्यात आले.

ग्रामीण भागातील या शाळेतील मुलींना शाळेत ये जा करण्यासाठी दररोजची पायपीट करावी लागत असे. हा मुलींना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी आदर्श पर्यावरण बेटी बचाओ बेटी पढाओ उपक्रम राबविण्यात आला. आणि या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता.



या कार्यक्रमासाठी भारतीय स्टेट बँकेचे रिजनल मॅनेजर विलास शिंदे, पेण रायगड विभाग चीफ मॅनेजर स्वप्निल तांबोळी, क्रेडिट डिपार्टमेंट पेणचे रायगड विभाग ज्ञानेश्वर जरारे, एफ. आय .डिपार्टमेंट पेण, रायगड विभाग, शाखा व्यवस्थापक रविंद्र चिंध, आदित्य म्हात्रे, चिराग म्हात्रे, यांच्यासह बँकेचे अन्य कर्मचारी व हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या उपाध्यक्षा सरोज डाकी, मंडळाचे सल्लागार सुबोध मोकल, कार्यकारणी सदस्य निशिकांतजी मोकल, मुख्याध्यापक बी. डी. गायकवाड, पर्यवेक्षक प्रबळकर, शिक्षक, सर्व मुलींचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन बी जी.शिकारे यांनी केले. मुख्याध्यापक बी.डी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शिकारे व श्री आंधळे यांनी या उपक्रमासाठी पाठपुरावा केला.

# रसायनीत श्रीराम नवमीनिमित्त भव्य मिरवणूक; भक्तांची मांदियाळी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अर्ध्यावर धर्मांच्या विजयाचे प्रतीक आणि मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव सोहळा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

चैत्र नवरात्रीची सांगता आणि प्रभू श्रीरामाचा आगमनचा आनंद व्यक्त करण्यासाठी सकाळपासून अखिल आर्यंवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले होते. सकाळी १० वाजता मोहोपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात श्रीराम पुजेचा कार्यक्रम पार पडली. यानंतर मोहोपाडा ते चौक अशी बजरंग बांधवांनी बाईक रॅली काढली. यावेळी जय श्री राम,प्रभू श्रीराम चंद्रकी जयच्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला होता. दु.५ वाजता शिवनगर येथील श्री गणेश मंदिरातून आरती करुन रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या हस्ते पालखी मिरवणूकीला प्रारंभ करण्यात आला.

शिवनगरहून भव्य दिव्य आकर्षक श्री राम प्रभूंची पालखी मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक शिवनगर हून श्री हनुमान मंदिर येथून चांभार्ली छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून दांड रसायनी रस्तावरुन मोहोपाडा मुख्य बाजारपेठ अशी ढोल ताशा झांझपथक, डिजेच्या तालावर काढण्यात आली.

या मिरवणुकीला अनेक मान्यवरांनी भेट देऊन प्रभू श्रीराम चंद्राचे आशिर्वाद घेतले. आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या कार्यक्रम नियोजनाची नागरिकांनी स्तुती केली.

# रिटघर विद्यालयात स्वतंत्र फिमेल टॉयलेट युनीटचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे शुक्रवारी (दि.२७) शाळेतील विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र फिमेल टॉयलेट युनीटचे उद्घाटन करण्यात आले. तळोजा एमआयडीसीतील एशियन पेंट्स पी.पी.जी. प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या तर्फे युनिट सुरू करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी प्रमुख पाहुणे राजेंद्र आगाशे (एचआर मनेजर), निलेश गोरड (ऑफिसर), अविनाश पाटील (अध्यक्ष, जनसेवा चॅरीटेबल सेंटर पुणे) यांच्या हस्ते स्वतंत्र फिमेल टॉयलेट युनीटचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे जेष्ठ सदस्य सुभाष भोपी, विलास भोपी, भारत भोपी, नवनाथ भोपी, दीपक पाटील (पो.पाटील) उपस्थित होते.

राजेंद्र आगाशे, अविनाश पाटील यांनी सदर फिमेल टॉयलेट युनिटच्या रोजच्या वापरासाठी विद्यालयाने विद्यार्थिनींचा एक हेल्थ ग्रुप तयार करून फीमेल टॉयलेट युनिटचा रोजचा वापर आणि नियमित स्वच्छता ठेवणे तसेच सदर टॉयलेट युनिटच्या विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने होणारा सकारात्मक उपयोग होत आहे याबाबत वेळोवेळी फॉलोअप घेणे आणि त्यानुसार योग्य ते आरोग्य विषयक मार्गदर्शन करणे अनिवार्य आहे असे सुचवले. दक्षता भोपी हिने आपले मनोगत व्यक्त केल.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित पाटील, विद्यालयाचे मुखयाध्यापक आर.बी. कारंडे यांनी आभार मानले व कार्यक्रम झाला.

# बेलापूर गावात रामजन्मोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

धार्मिक परंपरा आणि सांस्कृतिक वारशाची जपणूक करणाऱ्या नवी मुंबईतील बेलापूर गावात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. गुरुवारी (दि. २६) रोजी पार पडलेल्या या सोहळ्याला पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी उपस्थिती लावून श्रीरामांचे दर्शन घेतले.



ठाणे-बेलापूर पट्टीतील 'मंदिरांचे गाव' म्हणून ओळख असलेल्या बेलापूरमध्ये रामनवमी आणि गोवर्धनी मातेच्या उत्सवाला विशेष महत्त्व आहे. विशेषतः श्रीराम-मारुती जन्मोत्सव हा या परिसरातील सर्वात मोठ्या धार्मिक उत्सवांपैकी एक मानला जातो. सुमारे दोनशे वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवाने यंदाही भक्तांना आध्यात्मिक आनंदाचा अनुभव दिला. मान्यवरांच्या उपस्थितीत दुपारी १२.४० वाजता रामजन्म सोहळा पार पडला.

उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण बेलापूर गाव आठवडाभर आधीपासून सजविण्यात आले होते. आकर्षक रोषणाई, फुलांची सजावट आणि भक्तिमय वातावरणामुळे गावात उत्सवाची चैतन्यदायी झलक पाहायला मिळाली. हा उत्सव केवळ रामनवमीपुरता मर्यादित नसून गुढीपाडव्यापासून त्याची सुरुवात होते. चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू श्रीरामांना अभिषेक करून उत्सवाला प्रारंभ होतो, तर सांगता हनुमान जयंतीला मारुती जन्मोत्सवाने केली जाते. या कालावधीत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

रामनवमीच्या रात्री १२ वाजता श्रीरामांच्या पालखीची भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. या मिरवणुकीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. दुसऱ्या दिवशी गोपालकाला प्रसाद वाटप करून रामजन्मोत्सवाची सांगता करण्यात आली.

# निसर्ग चक्राप्रमाणे पानगळ हंगामास प्रारंभ



**उरण : बातमीदार**

पानगळ ही वृक्षाच्या जीवनामध्ये एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. यामध्ये भरपूर पाणी असलेल्या वृक्षाची पाने एखादा ठराविक ऋतूमध्ये गळून जातात. जगाच्या वेगवेगळ्या भागात हा कालावधी वेगवेगळ्या पद्धतीने आढळून येतो. कालावधी ऋतूचा असतो तर उष्णकटिंबात हवामान होण्याआधी पानगळ होते पानगडीमुळे वनस्पती मधील पानाद्वारे होणारे बाष्पीभवन थांबण्यास मदत होते याला पानगळ असे म्हणतात.

या ऋतूला शिशिर ऋतू असे म्हणतात. म्हणजेच आज घडीला किशोर ऋतुचा महिना चालू असून सर्व गळून गेल्यानंतर झाड हा पुन्हा नवीन पाने फुले फळे ग्रहण करण्यास तयार असतो. आज उरण मध्ये सर्व झाडांचे वृक्षाचे पाने प्रचंड प्रमाणात गळत असल्याचे चित्र दिसत आहेत.

ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पान झाल्यास त्या झाडावर वेळेवर ही मोठ्या परिणाम होतो. सध्याच्या हवामानातील बदलामुळे म्हणजेच अचानक अनियमित थंडी पावसाच्या सरी व लगेच ३५ ते ३६ कडे जाणारी उष्णता यामुळे अनेक भागात पानगळीची समस्या वाढली आहे. पानगळ म्हणजेच झाडाची पाने नियोजित वेळेत गळून पडणे. नैसर्गिक रित्या झाडाच्या जुन्या किंवा अतिरिक्त पानापासून मुक्त होण्याची ही प्रक्रिया घडते. झाडाला नवीन पालवी येण्यास मदत होते आणि नवीन फुल धरण्यासाठी, फळ धरणे साठी ऊर्जा मिळते.

आज सर्वच परजातीची झाडे ही पानगळ करीत आहेत व नवीन पाने उगवण्यास सज्ज झालेले आहेत. यालाच निसर्ग नियमाप्रमाणे झाडांना नवचैतन्य प्राप्त करून देण्याची प्रक्रिया म्हणतात. आज घडीला उरण तालुक्यात सर्वच प्रत्येक झाडाखाली पानगळीचे अनोखे दृश्य दिसत आहे.

# नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलचे 'ॲलर्जी क्लिनिक' सुरू

**पनवेल : वार्ताहर**

वाढत्या ॲलर्जीच्या समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून न्यूईरा हॉस्पिटलने नवी मुंबईत अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त 'ॲलर्जी क्लिनिक' सुरू केले आहे. या क्लिनिकअंतर्गत रुग्णांसाठी एक विशेष 'ॲलर्जी पॅकेज'तयार करण्यात आले असून,यातंर्गत एकाच पॅनेलमध्ये तब्बल १५० ॲलर्जन्सची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

ॲलर्जीची लक्षणांकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते किंवा त्यावर चुकीच्या पद्धतीने उपचार केले जातात ज्यामुळे रुग्णांना दीर्घकाळ त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक अन्न, पर्यावरण आणि जीवनशैलीशी संबंधित विविध प्रकारच्या ॲलर्जींचे अचूक निदान करण्यास मदत करणार आहे. यामुळे रुग्णांना त्यांच्या ॲलर्जीचे मूळ कारण (ट्रिगर्स) ओळखता येईल आणि त्यानुसार वैयक्तिक उपचार योजना आखता येतील.

या क्लिनिकचे उद्घाटन डॉ. अमिश वाखलू, डॉ. चंद्रशेखर टी., डॉ. निशांत तावडे आणि डॉ. मनीष पेंडसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील कुट्टी आणि डॉ. माताप्रसाद गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती.

# उरणमध्ये ३ एप्रिलपासून यात्रा, पालख्या

**उरण : वार्ताहर**

चैत्र महिन्यांची सुरुवात झाली आहे. २ एप्रिल रोजी हनुमान जयंती साजरी होताच लागलीच उरण ग्रामीण भागातील गांवागांवातील ग्रामदैवत, देवीदेवतांच्या यात्रा, पालखी सोहळ्याची धूम सुरू होणार आहे.

फुंडा गावची घुरबा देवीचीही यात्रा उत्सव ३ एप्रिल रोजी साजरा करण्यात येणार आहे. त्याचदिवशी समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या न्हावा गावाच्या डोंगरातील निसर्गाच्या सान्निध्यात गावदेवी वसलेली आहे. मंदिरात विराजमान असलेल्या न्हावा ग्रामस्थांची ग्रामदैवत गावदेवीवर ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकांची अपार श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळे दरवर्षी सलग दोनतीन दिवस रंगणाऱ्या या गावदेवीच्या यात्रा-पालखी सोहळ्यासाठी हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी उसळते. भाविकांच्या मनोरंजन, विरंगुळ्यासाठी वेगवेगळ्या तऱ्हेची दुकाने, आकाशपाळणे यांची मोठी रेलचेल असते.

रात्री ९ वाजता देवीची मिरवणूक पालखी काढण्यात येते. पालखी मिरवणूक गावभर फिरवण्यात येते. गुलाल उधळीत विविध वाद्यांच्या तालावर नाचत पालखी मिरवणुकीत भाविक सहभागी होतात. भाविकांच्या उत्साहामुळे देवीची पालखी माघारी मंदिरात येण्यासाठी कधी-कधी ३६ व ४८ तासांहूनही अधिक काळावधी लागतो. अशा या न्हावा गावची ग्रामदेवता गावदेवीचा यात्रा उत्सव शुक्रवारी ३ तर पालखी सोहळा शनिवारी ४ एप्रिल रोजी साजरा केला जाणार आहे.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सुंदर,सुबक मंदिरात द्रोणागिरी देवी वसलेली आहे. भक्ताच्या हाकेला धावणारी, भक्तांच्या नवसाला पावणारी द्रोणागिरी देवी अवघ्या पंचक्रोशीतील आगरी- कोळ्यांची माऊली आहे. द्रोणागिरी देवीच्या यात्रा पालखी मिरवणूक हजारो भाविक मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीच्या चरणी नतमस्तक होतात. करंजा येथील द्रोणागिरी देवीची यात्रा पालखी सोहळा ९ व १० एप्रिल रोजी साजरा करण्यात येणार आहे. देवीदेवतांनी सजवलेल्या चित्ररथातुन देवीची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

जसखार ग्रामस्थांची प्रसिद्ध ग्रामदेवता श्री रत्नेश्वरी देवीचा यात्रा पालखी उत्सवही दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षीही श्री रत्नेश्वरी देवीचा यात्रा पालखी सोहळा १०,११,१२ एप्रिल असा सलग तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. लाखो भक्तांची श्रद्धास्थान असलेल्या श्री रत्नेश्वरी देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविकांची गर्दी उसळते. देवीचा महिमा वाढतच चालल्याने दिवसेंदिवस येणाऱ्या भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत चालली आहे. त्यानंतर गव्हाण गावच्या शांतादेवी आणि नवीन शेवा येथील शांतेश्वरी देवीची यात्रा-पालखी सोहळा ११ व १२ एप्रिल साजरा केला जाणार आहे.

१७ एप्रिल रोजी चैत्र अमावस्येला कोप्रोली गावची ग्रामदेवता जोगेश्वरी माता व बापुजी यात्रा उत्सव पार पडणार आहे.

# तळाशेत जि.प.मतदार संघातील मागील पराभवाचा वचपा यावेळेस काढला -खासदार तटकरे

**माणगाव : बातमीदार**

मागील जिल्हा परिषद निवडणुकीत तळाशेत जिल्हा परिषद मतदार संघात संगीता बक्कम यांचा पराभव झाला होता. विरोधकांना निवडून आल्यानंतर हा जिल्हा परिषद मतदार संघ म्हणजे आपलीच मक्तेदारी वाटत होती. परंतु या वेळेस झालेल्या निवडणुकीत मागील पराभवाचा वचपा संगीता भक्कम यांना निवडून आणून काढला असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी इंदापूर विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे नवनिर्वाचित जि. प. व पं. स. सदस्यांचा जाहीर सत्कार समारंभात केला.



इंदापूर विभागात राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे राष्ट्रवादीच्या जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीमध्ये विजय झालेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा जाहीर सत्कार कार्यक्रम दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी मंगेशी कार्यालय इंदापूर येथे खा. सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी. जि. प. सदस्या दिशा जाधव, माणगाव पंचायत समिती सदस्य तथा उपसभापती मनीषा मालोरे, संगीता बक्कम, अलका केकाणे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, जिल्हा उपाध्यक्ष शेखरशेठ देशमुख, भुवन सरपंच दीपक जाधव, माणगाव तालुका अध्यक्ष काका नवगणे, संदेश मालोरे,खरवली सरपंच संतोष खडतर,उदय अधिकारी, मेघनाथ सातपुते, बाळा खातु, महेश महाजन, नितीन घोणे,शुक्रदास मोरे, संजय दळवी, राजू कदम तसेच इंदापूर विभागातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांमध्ये उमरोलीदिवाळी बौद्धवाडी येथील प्रमोद दळवी,संजय दळवी, कमलाकर दळवी, प्रभाकर दळवी,प्रथमेश दळवी, कृपा दळवी ( उपसरपंच),स्वाती राजेंद्र गायकवाड (ग्रामपंचायत सदस्य), दिपक धोंडू गायकवाड, गौतम प्रकाश साळवी, प्रमिला प्रकाश साळवी, प्रभावती प्रभाकर साळवी,प्रतीक्षा प्रभाकर साळवी,कृष्णा नामदेव मोरे,प्रभाकर नामदेव मोरे,प्राजक्ता प्रफुल्ल साळवी, प्रेरणा प्रफुल्ल साळवी,राजेंद्र धोंडू गायकवाड, विशाल संजीवन गायकवाड, निलम गायकवाड ग्रामस्थ व मुंबईकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

# माणगावात रामनवमीनिमित्त शोभायात्रा

**माणगाव : प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तार होणाऱ्या आणि मुंबई-गोवा महामार्गावर वसलेल्या व भौगोलिकदृष्ट्या रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगांव शहरात गुरुवारी समस्त माणगांवकर हिंदू बांधवांकडून श्री रामनवमी, रामजन्मोत्सव व शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हे ४ थे वर्ष असून या शोभायात्रेसाठी थेट आयोध्यवरून श्री रामांची मूर्ती दर्शनासाठी आणण्यात आली होती.



शोभायात्रेत श्री रामाचे दर्शन घेण्यासाठी माणगांव शहरात हजारोंच्या संख्येने जनसागर लोटला होता. जय जय श्री राम गजराने संपूर्ण माणगांव शहर दुमदुमून निघाले होते. कोकणातील सर्वात मोठी श्री राम नवमी माणगाव शहरात शांततेत पार पडली.

ही शोभायात्रेचा प्रारंभ माणगांव विकास कॉलनी येथील श्री साई मंदिर तहसील कार्यालय पटांगण येथून ढोल ताशांच्या गजरात सुरू करण्यात आली. ती पुढे कचेरी रोड ते मुंबई गोवा महामार्ग बाजारपेठ ते बालाजी कॉम्प्लेक्स व परत सोनभैरव मंदिर( खांदाड) येथे शोभायात्रेची सांगता करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. मुंबई गोवा महामार्गावर भव्य अशा कमानी उभारण्यात आल्या होत्या.

या वर्षी मुख्य आकर्षण श्री प्रभू रामचंद्र भव्य प्रतिमा आणि खास दिल्ली येथून उड्डाण करून करून दाखल झालेले श्री महाबली हनुमान सर्व रामभक्तांना साक्षात दर्शन दिले. भव्य श्री विठ्ठल रखुमाई मूर्ती सर्वांसाठी आकर्षण ठरली. तसेच भजनी मंडळ आणि वारकरी संप्रदाय टाळ - मृदुंगाच्या गजरात सुश्राव्य भजन करीत रामनामाचा जयघोष केला.

या शोभायात्रे संपूर्ण तालुक्यातून हिंदु बांधव, महिला, श्री राम भक्त व विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातले पदाधिकारी, व माणगांवकर उपस्थित होत्या. सायंकाळ श्री राम मंदिर खांदाड महाआरती करण्यात आली. तसेच सोनभैरव मंदिर खांदाड येथे महाप्रसादाचेदेखील नियोजन करण्यात आले होते.

# श्रीवर्धन विधानसभा बीएलए-१ प्रमुखपदी अमित घाग

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश तर्फे राबविण्यात येत असलेल्या मतदार पुनर्निरीक्षण (SIR) अभियानाच्या पार्श्वभूमीवर १९३-श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रासाठी BLA-१ (विधानसभा प्रमुख) पदावर रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

ही नियुक्ती प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीच्या अधिकृत पत्राद्वारे जाहीर करण्यात आली असून, जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाच्या उच्च पातळीवरून घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रातील संघटनात्मक कार्याला निश्चितच नवी दिशा मिळणार असल्याचे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

अमित घाग हे रोहा तालुक्यातील सक्रिय, तळागाळातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवणारे आणि संघटन कौशल्यासाठी ओळखले जाणारे नेतृत्व आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे पक्षाच्या मतदार पुनर्निरीक्षण अभियानाला गती मिळणार असून, प्रत्येक बूथपर्यंत पोहोचून मतदारांची अचूक नोंदणी, संपर्क व संवाद वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. आपल्या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया देताना अमित घाग यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ही जबाबदारी पूर्ण निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाने पार पाडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. "पक्ष संघटन अधिक मजबूत करणे, प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे आणि SIR अभियान यशस्वी करणे हेच माझे प्रमुख उद्दिष्ट राहील," असे त्यांनी स्पष्ट केले.

# महावीर जयंतीनिमित्त नागोठण्यात मांसाहारी दुकाने बंद ठेवण्याची मागणी; ग्रामपंचायतीला निवेदन सादर

**नागोठणे : बातमीदार**

भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त अहिंसा आणि शांततेचा संदेश जपण्यासाठी नागोठणे येथील जैन समाज बांधवांनी मांसाहारी दुकाने बंद ठेवण्याची मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन नागोठणे ग्रामपंचायतीला देण्यात आले.




महावीर जयंती हा जैन समाजासाठी अत्यंत पवित्र दिवस असून, "जगा आणि जगू द्या" हा अहिंसेचा संदेश या दिवशी अधोरेखित केला जातो. या पार्श्वभूमीवर दि. २९ मार्च २०२६ रोजी नागोठणे परिसरातील सर्व कत्तलखाने तसेच मांस व चिकन-मटण विक्रीची दुकाने पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. भारतीय जैन संघटनेचे मार्गदर्शक शांतिलालजी मुथा व रायगड जिल्हा अध्यक्ष दिवेश जैन यांच्या सूचनेनुसार हे निवेदन नागोठणे ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे यांना देण्यात आले.

या प्रसंगी भारतीय जैन संघटना नागोठणे शहराध्यक्ष गौतम जैन, जुगनशेठ जैन, कमलेश जैन, अंकुश जैन, जयंतीलाल जैन, श्रीपाल जैन, रितिक जैन, संजय जैन, हितेश जैन, पंकज जैन, विकेश जैन, बंटी जैन यांच्यासह जैन समाजातील अनेक बांधव उपस्थित होते.

# डॉ. राजनीश कामत बाटुचे अतिरिक्त कुलगुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरु डॉ. कारभारी काळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर विद्यापीठात कुलगुरू पदात महत्त्वपूर्ण बदल झाला असून मा. राज्यपालांच्या आदेशा नुसार ता. २५ मार्च रोजी बुधवारी डॉ. राजनीश कामत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या अतिरिक्त कुलगुरू पदाचा कार्यभार विद्यमान कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडून स्वीकारला आहे.



डॉ. राजनीश के. कामत हे उच्च शिक्षण क्षेत्रातील एक अनुभवी आणि कुशल प्रशासक म्हणून ओळखले जातात. ते सध्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई येथे कुलगुरू व्हाईस चान्सलर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक ५ ऑगस्ट २०२२ पासून या पदाची धुरा सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनवृद्धी आणि विविध संलग्न संस्थांच्या समन्वयावर विशेष भर देण्यात येत आहे. उच्च शिक्षणातील नवनवीन धोरणांची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शिक्षण आणि उद्योग-संलग्न अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. विद्यमान कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. राजनीश कामत यांनी स्वीकारला आहे. या निमित्ताने आयोजित छोटेखानी कार्यक्रमात विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी माजी कुलगुरू डॉ. काळे यांनी आपल्या कार्यकाळातील अनुभव मांडत नवनियुक्त कुलगुरू डॉ. कामत यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

डॉ. राजनीश कामत हे सध्या मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ चे पहिले पूर्णवेळ कुलगुरू म्हणून ऑगस्ट २०२२ पासून कार्यरत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील रहिवासी असलेल्या डॉ. कामत यांना अध्यापन, संशोधन आणि प्रशासनाचा तब्बल २५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठ, गोवा विद्यापीठ तसेच सोलापूर विद्यापीठ येथे विविध जबाबदाऱ्या सांभाळत उल्लेखनीय योगदान दिले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर १६४ हून अधिक संशोधन प्रबंध प्रकाशित करण्याबरोबरच विज्ञान क्षेत्रातील १५ पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसह विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नव तेजस्विनी ग्रामीण महिला उद्यम कडून महिलांना प्रशिक्षण

**चौक : प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ जि.रायगड अंतर्गत प्रगती लोक संचलीत साधन केंद्र द्वारा नव तेजस्विनी ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत मा.वि.म. मित्र मंडळ व CRP करिता हवामान लवचिकता प्रशिक्षण सेवन स्टार रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आले होते.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगतीच्या व्यवस्थापक पदमावती गायकवाड यांनी केले. प्रशिक्षणाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.प्रशिक्षणाचे प्रास्ताविक माविम रायगड चे जिल्हा समन्वय अधिकारी विजय डोके यांनी केले. हवामान बदल,व वातावरणात होणारा परिणाम यावर मार्गदर्शन केले. प्रादेशिक कृषी शिक्षण अधिकारी मर्दाने यांनी पिक विषयी मार्गदर्शन दिले. माविम रायगड चे जिल्हा समन्वय अधिकारी विजय यांनी हवामान बदल यावर मार्गदर्शन केले,

या दोन दिवसांच्या निवासी प्रशिक्षणाला टेक्निकल सपोर्ट माविम रायगड चे AMO प्रसाद पिंपळकर यांनी सहकार्य केले. या प्रशिक्षणात वातावरणातील बदल कसे होतात. हवेत कार्बन डायऑक्साइडमुळे जगाची हानी कशी होत आहे. याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. एलपीजी गॅस,कार्बन डाय-ऑक्साइड वाढवण्याचे काम करत आहे. यामुळे जगात कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. डेव्हलपमेंट च्या नावाने आपल्या परिसराची व देशाची हानी आपण स्वतः करत आहोत. प्रत्येक ठिकाणी वृक्षतोड करून नॅचरल ऑक्सिजन कमी होत आहे. त्यामुळे नॅचरल ऑक्सिजन सोडून, एसीची हवा घ्यायला आपण सर्वांनी सुरुवात केली आहे. आपल्या शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर जास्त प्रमाणात केला जात आहे. त्यामुळे मातीतील पिकांची क्षमता कमी होऊ लागली आहे. आणि ते पीक वाढवण्यासाठी आपण रासायनिक खते मोठ्या प्रमाणात वापरत आहोत, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

कार्बन डाय-ऑक्साइड हे कोळसा, ऑइल, गॅस, इलेक्ट्रिक सिटी हे जास्त प्रमाणात झाल्याने हवेमध्ये कार्बन डाय-ऑक्साइड तयार होत आहेत. प्रशिक्षणामध्ये घरगुती गॅस कमी वापर करणे, गरज असल्यास गाडी वापरणे, परिवहन मंडळाच्या गाड्यांचा वापर प्रवासासाठी जास्तीत जास्त करणे, दोन किलोमीटरच्या अंतरावरील प्रवास पायी करणे, इलेक्ट्रिक सिटी चा वापर कमी करणे, वृक्षतोड थांबवणे, असे अनेक उपाय सांगण्यात आले. दोन दिवसाचे निवासी प्रशिक्षण खूपच मोलाचे झाले आहे

# रायगड जिल्हा नाभिक तरूण संघाच्या नवी कार्यकारिणी जाहीर



**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा नाभिक तरूण संघाच्या नव निर्वाचित कार्यकारिणीचा पदनियुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम रायगड जिल्हा अध्यक्ष सुदाम बाबु शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विश्वस्तांच्या शुभहस्ते संपन्न झाला.या कार्यक्रमात दिनेश मोरे यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी आदेश बुरुणकर (दक्षिण विभाग), भगवान निमुतकर (मध्य विभाग) आणि विनोद पवार (उत्तर विभाग) यांची निवड करण्यात आली.

मुख्य सचिवपदी सुरेंद्र पालांडे यांची निवड करण्यात आली असून सहसचिवपदी सचिन दिवेकर (दक्षिण), विजय भोसले (मध्य) आणि जयेश मोरे (उत्तर) यांची नियुक्ती झाली. कोषाध्यक्षपदी योगेश शिर्के तर हिशोब तपासनीसपदी नितीन बडे आणि सह हिशोब तपासनीसपदी जयंत शिंदे यांची निवड करण्यात आली.महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी म्हणून संतोष गायकवाड, लवाद कमिटी अध्यक्षपदी राज पवार आणि उपाध्यक्षपदी किरण शिंदे यांची निवड झाली. तसेच पंचकोशी अध्यक्षपदी बबन सकपाळ (दक्षिण), प्रमोद जाधव (मध्य) आणि सुनिल खराडे (उत्तर) यांची नियुक्ती करण्यात आली.संघटकपदी संदीप चाफेकर (दक्षिण), प्रविण खराडे (मध्य) आणि अमित पंडीत (उत्तर) यांची निवड झाली. याशिवाय १३ सल्लागार, ४५ जिल्हा सदस्य, १५ तालुका अध्यक्ष आणि एक महिला प्रतिनिधी अशा विविध पदांवर नियुया करण्यात आल्या.

कार्यक्रमात "पदाचा हक्क, अधिकार आणि काम" या विषयावर जिल्हाध्यक्ष सुदाम शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच बापुसाहेब सोनगिरे, मयूर दिवेकर आणि यशवंत खराडे या विश्वस्तांसह अनेक जिल्हा पदाधिकाऱ्यांनीही मार्गदर्शन केले.सभेचे सुत्रसंचालन मा. जिल्हा सचिव सुरेंद्र पालांडे यांनी उत्कृष्टरीत्या केले.

उपस्थित समाजबांधवांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकार्य केले. रायगड जिल्हा नाभिक तरूण संघाची पुढील वाटचाल सामाजिक प्रगती व उत्कर्षाच्या दिशेनेच राहील, असा विश्वास व्यक्त करत कार्याध्यक्ष दिनेश मोरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# माजी विद्यार्थ्यांनी शाळेला सदिच्छा भेट देऊन केली मदत

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा कैरे ता. खालापूर येथील माजी विद्यार्थी यांनी शाळेला सदिच्छा भेट देऊन, शाळा आणि विद्यार्थी यांना मदत केल्याने माजी विद्यार्थी यांचे कौतुक होत असून शाळा मुख्याध्यापक महेंद्र जाधव यांनी माजी विद्यार्थी यांना भेटवस्तू देऊन स्वागत केले.

माजी विद्यार्थी संघ शाळा कैरे यांनी एकत्रित येऊन आपण शिकलेल्या शाळेला भेट देऊन शाळा, विद्यार्थी व शिक्षक यांच्या अडचणी समजून घेतल्या.शाळेची प्रगती पाहून यापुढे शाळेला शैक्षणिक मदत करण्याचे आश्वासन दिले.माजी विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला उपस्थित माजी विद्यार्थ्यांना शाळा मुख्याध्यापक महेंद्र जाधव यांनी पुष्प गुच्छ आणि पेन देऊन स्वागत केले व त्यांचे आभार मानले.शाळेच्या शिक्षिका सौ शुभांगी भंडारकर,श्रीमती नलिनी चोगले, श्रीमती अर्चना पाटील यांनी महिला माजी विद्यार्थीनीना गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. शाळेच्या पदवीधर शिक्षिका श्रीमती तृप्ती ताठरे यांनी सुत्र संचालन केले. यावेळी

माजी विद्यार्थी समितीचे अध्यक्ष नंदकुमार पाटील उपाध्यक्ष हरेष पाटील, कोषाध्यक्ष पदमाकर पाटील आणि मनिष पाटील आदी मान्यवर उपस्थित राहुन त्यांनी या मेळाव्यात आपल्या जून्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांना जेवणासाठी ८० स्टिल ताटे,वाटी, ग्लास आणि परिक्षेसाठी सर्व विद्यार्थी यांना रायटिंग पॅड यांचे वाटप करण्यात आले.समितीचे खजिनदार पदमाकर पाटील यांनी शाळेच्या नावाची कमानी उभी करून दिली.



# मुंबई इंडियन्सची ताकद वाढणार

## स्टार खेळाडूची संघात एन्ट्री




**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा १९वा सीझन उद्यापासून सुरु होणार आहे. आयपीएस सुरु होण्याआधीच मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची बातमी आहे. स्पोर्टस्टार रिपोर्टनुसार, आता जसप्रीत बुमराह मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला आहे. २९ मार्च रोजी पहिली मॅच होणार आहे. त्याआधीच जसप्रीत बुमराह संघात दाखल झाला आहे. मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

जसप्रीत बुमराह हा सेंटर ऑफ एक्सलेन्स येथे गेला होता. त्यानंतर त्यांच्या फिटनेसबाबत चर्चा सुरु झाल्या होत्या. मिडिया रिपोर्टनुसार, बुमराह बंगळुरु येथील सेंटर ऑफ एक्सलेन्समध्ये आपल्या फिटनेसवर काम करत होता. बुमराहला कोणतीही दुखापत झालेला नाही. परंतु वर्कलोड मॅनेजमेंटचा भाग म्हणून त्याने स्ट्रेंथ आणि कंडिशनिंगवर काम करण्यासाठी सेंटर ऑफ एक्सीलेन्सला भेट दिली होती. यानंतर बुमराह आता पुन्हा एकदा मुंबई इंडियन्स (MI) संघात सामील झाल्याची माहिती समोर आली आहे.

**बीसीसीआयचा नियम**

बीसीसीआयच्या वार्षिक करारानुसार आयपीएल सुरु होण्याआधी खेळाडूंना सेंटर ऑफ एक्सलन्सला भेट द्यावी लागले. तिथे त्यांच्या फिटनेसचा आढावा घेतला जातो. त्यात जे खेळाडू उत्तीर्ण होतात तेच आयपीएलमध्ये खेळू शकतात. यामुळेच बुमराहला मुंबई इंडियन्स संघात दाखल होण्यास उशिर होत होता.

**गोलंदाजीचा सराव**

बंगळुरुत असताना बुमराहने आपल्या फिटनेसवर मेहनत घेतली असल्याचे सूत्रांनी सांगितले. वर्ल्ड कपमध्ये बुमराहने चांगली कामगिरी केली होती. त्यानंतर बुमराहच्या स्पर्धासंदर्भातील नियोजनदेखील करण्यात आले आहे. बुमराह बंगळुरुतील केंद्रात सराव करत होता. त्यानंतर आता तो पुन्हा संघात सामील झाला आहे.

# फुटबॉल कोच खालिद जमील आणि खेळाडूंना स्टेडियममध्ये प्रवेश नाकारला

## कोचीमधील पेमेंट वादाचा फटका



**कोची : वृत्तसंस्था**

कोची येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर सरावासाठी आणि पत्रकार परिषदेसाठी गेलेले भारतीय फुटबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक खालिद जमील आणि खेळाडूंना सुरक्षा रक्षकांनी प्रवेश नाकारला. स्टेडियमच्या मालकी हक्क असलेल्या 'ग्रेटर कोचीन डेव्हलपमेंट अथॉरिटी'ने सुरक्षा ठेव भरली नसल्याचे कारण देत हा निर्णय घेतला.

३१ मार्च रोजी होणाऱ्या हाँगकाँगविरुद्धच्या एएफसी आशियाई चषक पात्रता फेरीच्या सामन्यासाठी कोचीमध्ये सराव सुरू आहे. नियमानुसार केरळ फुटबॉल असोसिएशनला स्टेडियमच्या वापरासाठी २५ लाख रुपये सुरक्षा ठेव आणि तीन लाख रुपये भाडे भरायचे होते. हे पैसे न मिळाल्याने सुरक्षा रक्षकांनी स्टेडियमचे मुख्य गेट उघडण्यास नकार दिला.

मुख्य प्रशिक्षक खालिद जमील यांच्यासह आशिक़ कुरुनियान, सहल अब्दुल समद आणि बिजोय वर्गीस हे खेळाडू स्टेडियमवर पोहचले होते, मात्र बराच वेळ वाट पाहूनही प्रवेश न मिळाल्याने त्यांना हॉटेलवर परतावे लागले. अखेर भारतीय संघाला स्टेडियमपासून १० किमी दूर असलेल्या केरळ ब्लास्टर्सच्या मैदानावर सराव करावा लागला. या गोंधळामुळे गुरुवारी नियोजित असलेली महत्त्वाची पत्रकार परिषद रद्द करावी लागली. पत्रकार आणि माध्यमांच्या प्रतिनिधींनाही गेटबाहेरच रोखण्यात आले होते.

कोचीमध्ये तब्बल १० वर्षांनंतर भारतीय राष्ट्रीय संघाचा सामना होत आहे. अशा महत्त्वाच्या प्रसंगी प्रशासकीय समन्वयाचा अभाव दिसून आल्याने भारतीय फुटबॉलच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. यापूर्वी केरळ ब्लास्टर्ससोबतही असाच प्रकार घडला होता.

**'एआयएफएफ'चे स्पष्टीकरण**

ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनने (एआयएफएफ) या घटनेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. तांत्रिक अडचणीमुळे हा प्रकार घडला असून सामन्यापूर्वी सर्व औपचारिकता पूर्ण केली जाईल. ३१ मार्चचा सामना नियोजित वेळापत्रकानुसारच होईल, असे एआयएफएफने स्पष्ट केले आहे.

---



# अविनाश शिंदेला 'मुंबई श्री'मध्ये रौप्यपदक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या तुर्भे गावातील अविनाश शिंदे याने शरीरसौष्ठव क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेच्या मुंबई श्री स्पर्धेत रौप्यपदक पटकावत आपल्या मेहनतीची छाप उमटवली.

रोजच्या कष्टांमध्ये स्वतःचा व्यवसाय सांभाळत, कुटुंबाची जबाबदारी निभावत आणि वेळेच्या मर्यादांशी झुंज देत अविनाशने फिटनेसची साधना अखंड सुरू ठेवली. प्रत्येक दिवशी स्वतःशीच लढत अडचणींना संधीमध्ये बदलत त्याने आपली शरीरयष्टी घडवली. 'मुंबई श्री'च्या रंगमंचावर त्याचे सादरीकरण हे केवळ शरीराचे नव्हे, तर त्याच्या मेहनतीच्या प्रवासाचे दर्शन घडवणारे होते. त्यामुळेच परीक्षकांची मने जिंकत त्याने दुसऱ्या क्रमांकावर आपले नाव कोरले.

अविनाशच्या या यशामुळे केवळ त्याच्या कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण परिसराला अभिमान वाटत आहे. परिसरात त्याचे अभिनंदन होत आहे.

# युवा क्रिकेटर वैभव सूर्यवंशी चर्चेत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने कमी वयात असे काही करून दाखवले आहे, जे खूप कमी लोकांना जमले. आयपीएलच्या दुसऱ्याच सामन्यात शतक, अंडर-१९ क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडून वैभवने अनेक मोठे रेकॉर्ड आपल्या नावावर केले आहेत. त्यामुळे आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू होण्याआधी तो तुफान चर्चेत आहे.

वयाची १५ वर्ष पूर्ण होताच वैभवचे भारतीय संघात स्थान मिळवण्याचे दार उघड झाले आहे. त्यामुळे वैभव आता लवकरच भारताकडून खेळणार, अशी चर्चा रंगत आहे. वैभवने वयाच्या १४व्या वर्षी कोटींची कमाई केली आहे.

वैभव सूर्यवंशीची एकूण नेटवर्थ किती याबाबत कुठलाही अधिकृच आकडेवारी समोर आलेली नाही. सध्या तो आयपीएल स्पर्धेत राजस्थान रॉयल्स संघाचा भाग आहे. गेल्या हंगामातही तो या संघाकडून खेळताना दिसून आला होता. यासह तो भारतीय अंडर-१९ संघाचं प्रतिनिधित्व करतो.

---

# श्रीलंकन क्रिकेट बोर्डाने थुशाराला आयपीएल खेळण्याची परवानगी नाकारली

## फिटनेस टेस्ट अपात्र; आरसीबीला धक्का!



**कोलंबो : वृत्तसंस्था**

गत आयपीएल विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ शनिवारी (दि. २८) सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्याने यंदाच्या हंगामाची सुरुवात करणार आहे, मात्र या उद्घाटन सामन्यापूर्वी आरसीबीला मोठा धक्का बसला आहे. जलदगती गोलंदाज नुवान थुशारा संपूर्ण हंगामाला मुकणार आहे. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने त्याला ना हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याची माहिती समोर आली आहे.

अलीकडेच श्रीलंका क्रिकेट बोर्डाने खेळाडूंकरिता फिटनेस चाचणी अनिवार्य केली आहे. परदेशी टी-२० लीगमध्ये खेळण्यासाठी ही चाचणी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, मात्र थुशारा या फिटनेस टेस्टमध्ये आवश्यक निकष पूर्ण करू शकला नाही. त्यामुळेच त्याला आयपीएलमध्ये खेळण्यास परवानगी देण्यात आलेली नाही. परिणामी ३१ वर्षीय गोलंदाज सुमारे १.६ कोटींच्या कराराला मुकणार आहे.

थुशारा सध्या दुखापतग्रस्त नसला तरी त्याच्या फिटनेसबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे बोर्डाने कठोर भूमिका घेतल्याचं सांगितलं जात आहे. दुसरीकडे दुष्मंथा चमीरा, दसुन शनाका, पथुम निसंका आणि कमिंदू मेंडिस यांनी फिटनेस चाचणी पास करून आयपीएलमध्ये खेळण्यासाठी परवानगी मिळवली आहे.

श्रीलंकन स्पीडस्टार थुशाराने आयपीएल २०२५च्या हंगामात फक्त एकच सामना खेळला, ज्यात त्याने एक विकेट घेतली होती. त्याआधी २०२४च्या हंगामात त्याने सात सामन्यात आठ विकेट्स मिळवल्या होत्या. जोस हेजलवूड यंदा दुखापतीमुळे सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार आहे. यश दयाल करारबद्ध असला तरी यंदाच्या हंगामात तो खेळणार नाही, हे संघ व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे. या परिस्थितीत नुवान थुशारा स्पर्धेबाहेर पडणे आरसीबीसाठी मोठा धक्काच आहे. अनुभवी भुवनेश्वर कुमारसह न्यूझीलंडच्या जेकब डफी, अनकॅप्ड रसिख सलाम आणि अभिनंदन सिंग यांच्यावर या संघाची जलदगती गोलंदाजीची मदार असेल.

# रोहितला पाहून नीता अंबानी अवाक!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर स्टार खेळाडू रोहित शर्मा आणि संघाच्या मालकीण नीता अंबानी यांच्या भेटीचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. रोहित समोर येताच अंबानी यांना आश्चर्याचा धक्का बसतो.



व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये दिसून येते की, नीता अंबानी या रोहित शर्माची फिटनेस पाहून आश्चर्यचकीत झाल्या आहेत. त्या म्हणतात, "देवा! रोहित, मी तुला ओळखलंच नाही. तू तर अगदी लहान मुलासारखा (तरुण) दिसतोयस." नीता अंबानी यांच्या रिॲक्शनचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान चर्चेत आहे.

---

# माजी हॉकीपटूचा अपघातात मृत्यू

**नागपूर :** राष्ट्रीय स्तरावर हॉकी खेळलेले माजी खेळाडू कार्तिक राजना अरगुल्लेवार (वय ५९) यांचा अपघातात मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे क्रीडा वर्तुळासह कामठी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. भेंडीखाना परिसरात हा अपघात घडला. कार्तिक अरगुल्लेवार हे नेहमीप्रमाणे ते आपल्या ॲक्टिवा दुचाकीने घरी परतत असताना अचानक त्यांची दुचाकी घसरली. ते रस्त्यावर पडताच मागून वेगाने येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत वाहनाचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत त्यांना कामठी उपजिल्हा रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.





सौजन्य : भरत तुकाराम फराड (चिटणीस, पनवेल तालुका युवा मोर्चा उत्तर भाजपा)




ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्रंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

वर्ष २१ वे

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.



# अखंड हरिनाम सप्ताह



## ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

प्रारंभ: चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता: चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

### दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**मंगळवार, दि. ३१/०३/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. बळीराम महाराज (वाघीवली)
हरिपाठ - विठ्ठल रखमाई हरिपाठ मंडळ, खारकोपर
किर्तनकार - ज्ञानेश्वरी साधक ह.भ.प. नकुल महाराज भोईर (कोपरी-नवी मुंबई)
सौजन्य - श्री. सुधीर तुळशिदास ठाकूर (खारकोपर)

**बुधवार, दि. ०१/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव)
हरिपाठ - श्री गणेश हनुमान हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. श्रीकांत महाराज दुराफे (आळंदी - देवाची)
स्मरणार्थ - कै. सविता शिवाजी देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**गुरुवार, दि. ०२/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. मनीज महाराज (बेलपाडा)
हरिपाठ - भैरवनाथ हरिपाठ मंडळ, धुतूम
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. मारुती महाराज कोलाटकर (देवकान्हे-रोहा)
सौजन्य -सौ. श्रध्दा रमेश ठाकूर (खारकोपर)

**शुक्रवार, दि. ०३/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. राजेंद्र गुरुजी (कुंडेगाव)
हरिपाठ - शिवशंभी हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव- कर्जत)
स्मरणार्थ - कै. शिवाजी गजानन पाटील
सौजन्य - सौ. ललिता सुनिल पाटील (खारकोपर)

**शनिवार, दि. ०४/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी
किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**

सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

**काल्याचे कीर्तन:** मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com